◆ ऑगस्ट २००४
◆ वर्ष चौथे
◆ अंक आठवा

# मेहता मराठी ग्रंथजगत

— अनुक्रमणिका —

| | |
|---|---|
| **संपादकीय** | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **पुस्तक परिचय** | |
| द रेनमेकर : अनु. अनिल काळे | १९ |
| फर्स्ट टु डाय : अनु. रविंद्र गुर्जर | २३ |
| वायू प्रदूषण : डॉ. किशोर / नलिनी पवार | २७ |
| 'हॅलो मी इन्स्पेक्टर प्रधान बोलतोय' : व. कृ. जोशी | ३० |
| पोलिसकथा : व. कृ. जोशी | ३४ |
| **पुरस्कार** | ३७ |
| **श्रद्धांजली** | ३९ |
| **बालनगरी** | ४३ |

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी :
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**
**Website - mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

# नव्या प्रतिभावंतांची गरज

वाचनसंस्कृतीचा प्रसार ही एक सतत चालू राहणारी प्रक्रिया असायला हवी; आणि ती समाजाच्या सर्व थरांना स्पर्श करणारी हवी. मुद्रणपूर्वकाळात ग्रंथ हे धार्मिक पोथ्यांच्या स्वरूपात असत; हस्तलिखित स्वरूपात असत; साहजिकच ते पूजाविधी करणाऱ्यांच्या घरातच पिढ्यानपिढ्या जपले जात. मुद्रणामुळे पुस्तकाच्या अनेक प्रती काढणे सुलभ झाल्यावर ग्रंथ हे सर्वत्र उपलब्ध होणे आवाक्यात आले. परंतु केवळ सुशिक्षित वर्गालाच त्यांचे मोल व महत्त्व उमगले. एकेकाळी भारतासारख्या देशात सत्तर ऐंशी टक्के लोकसंख्या निरक्षर असल्याने ग्रंथांचा प्रसार सुशिक्षित, वरिष्ठ व मध्यमवर्गापुरताच सीमित राहिला. स्वातंत्र्यपूर्व काळात हा वर्ग संख्येने अल्प असला तरी साहित्याविषयी आस्था-आपुलकी बाळगणारा होता. मराठीपुरते बोलायचे तर मराठीत प्रसिद्ध होणाऱ्या एकूण पुस्तकांची संख्याही मोजकीच असे; आणि लेखकांची संख्याही बेताचीच असे. मोजकीच मासिके व वृत्तपत्रे निघत. त्यामुळे हा सुशिक्षित वर्ग त्याबाबत जागरूक असे. फडके-खांडेकरांच्या नव्या कादंबरीची तो उत्सुकतेने वाट बघे; किर्लोस्कर सारख्या मासिकातील प्रबोधनपर लेखांनी प्रभावित होई. त्यावर चर्चा करी. चाळीस-पन्नासाच्या दशकातही फडके-खांडेकरांच्या नव्या पुस्तकाच्या हजारावर प्रती सहज विकल्या जात; वैयक्तिक ग्राहक त्यात मोठ्या प्रमाणावर असत; परंतु गावोगावची ग्रंथालये व वाचनालयेही पुस्तक प्रसिद्ध झाल्याबरोबर त्याच्या प्रती विकत घेत आणि आपल्या सदस्यांना त्या लगेच उपलब्ध करून देत. त्यामुळे नव्या पुस्तकांची माहिती सुशिक्षित वर्गातील जागरूक वाचकांपर्यंत अल्पावधीत जाई; त्या वेळच्या एकूण वातावरणावर पुस्तकांचा चांगला प्रभाव पडे. खांडेकरांच्या ध्येयवादी नायकनायिकांच्या पावलावर पाऊल टाकायची ओढ अनेक युवायुवतींना लागून राही; फडक्यांच्या नायकनायिकांप्रमाणे प्रेमाची, आपुलकीची आकर्षक भाषा वापरावीशी वाटे. सानेगुरुजींच्या नायकांप्रमाणे समाज-देशकार्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची उर्मी उफाळून येई... साहित्य हे त्यावेळच्या तरुण वर्गावर अधिराज्य गाजवी. जीवनाचा मार्ग दाखवी. प्रेरणा देई. त्यावेळी वाचक वर्ग-लेखक वर्ग यांच्यात एक प्रकारचे सुसंवादी वातावरण होते.

परंतु साठोत्तरी काळात या वातावरणात फरक पडत गेला. शिक्षणाचा प्रसार झाल्याने वाचकवर्ग हा मध्यमवर्गीयांपुरता मर्यादित राहिला नाही. ग्रामीण, दलित, महिला या सर्वांना शिक्षणाची संधी सुलभ झाली. त्यामुळे त्यांच्यातही नव्या ज्ञानाबद्दल, कुतूहल जागे झाले. इतरांच्या कथा कादंबऱ्या वाचताना, त्यांचे जीवनानुभव वाचताना कुठेतरी आपणही आपले



जीवन, आपले अनुभव मांडावेत अशी प्रेरणा त्यांच्या मनात खळबळू लागली. त्यातून आरंभी चाकोरीबद्ध साहित्याचे अनुकरण करणारे लेखन होत राहिले; पण पुढे 'जेव्हा मी जात चोरली होती; (बाबूराव बागुल), माझे विद्यापीठ (नारायण सुर्वे)'यासारखी पुस्तके बाजारात आली. नवीन लेखकांना आपले अनुभव मध्यमवर्गीयांच्या रूढ वाङ्मयीन आकृतिबंधात बसवून मांडण्याची गरज उरली नाही; आपले अनुभव आपल्या भाषेत, आपल्या ढंगात मांडण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला बलुतं (दया पवार), उपरा (लक्ष्मण माने), मला उद्ध्वस्त व्हायचंय (मालिका अमरशेख), गोलपिठा (नामदेव ढसाळ), यासारखे पुस्तके प्रसिद्ध झाली; आणि दलित-ग्रामीण-स्त्री साहित्यकारांची एक नवी लाटच निर्माण झाली. मराठी साहित्याला नवा बहर आला. समाजाच्या विविध स्तरांमधल्या स्वप्रतिमांच्या जाणिवांना जाग आली. आपल्या समाजाबद्दल, आपल्या जात-जमातीबद्दल लिहायला हवे अशी अहमहमिका सुरू झाली. लेखनगुणाबद्दल, वाङ्मयप्रकाराबद्दल रूढ असणाऱ्या समज-संकेतांच्या चौकटीची कल्पनाच या नव्या लेखकांच्या पिढीला नव्हती; त्यामुळे जो तो आपल्याला जमेल तसे मोकळेपणाने लिहू लागला; आणि तेही छापले जाऊ लागले. वाचले जाऊ लागले; पुरस्कारप्राप्त होऊ लागले. काही लेखकांना आमदारकी मिळाली; शासनदरबारी त्यांची प्रतिष्ठा वाढली. स्वतंत्र संमेलने घेण्यासाठी त्यांना सोयीसुविधाही मिळू लागल्या. लेखक म्हणून मिळणाऱ्या या मान्यतेची नशा काही वेगळीच असते. दहा टक्क्यांमधला फ्लॅट वगैरे मार्गांनी त्या नशेला आणखी खुमारी आली.

मराठी साहित्याला या नव्या वातावरणात अधिक लोकाभिमुख होण्याची संधी मिळाली. गावोगाव सभंसंमेलने, व्याख्यानमाला नव्या जोमाने होऊ लागल्या. संमेलनांना तुफान गर्दी उसळू लागली. आपापल्या अस्मितांना धार चढू लागली. त्यामुळे काही लेखक प्रकाशकांच्या पुस्तकांचा उठावही जोरात होण्याला चालना मिळाली. चैत्यभूमीवर लाखोंची पुस्तके जाऊ लागली. साहित्याच्या सार्वत्रिक अभिसरणाला त्यामुळे गती मिळू शकेल असे वाटले. परंतु तसे खरोखर झालेय का असा प्रश्न पडतो. सभासंमेलनांना होणारी गर्दी, तेथील उत्साह थक्क करतो. पण चांगल्या साहित्याच्या खपाला, वितरणाला, आस्वादाला तो पोषक ठरतोय का असा प्रश्न पडतो. कारण एकूण पुस्तकांचा खप वाढत असला तरी नव्या कसदार कथा-कादंबऱ्यांचा व आत्मकथनांचा प्रवाह हा आज आटल्यासारखा वाटतो आहे. चळवळीचे साहित्य मध्यंतरी फोफावले होते; तेही आता मंदावले आहे असे वाटते. पाककला, ज्योतिष, व्यक्तिमत्त्वविकास, संगणक, इंग्लिशभाषेची तोंडओळख, व्यवसाय मार्गदर्शन, प्रवास-पर्यटन वगैरे विषयांवरची माहितीवजा पुस्तकेच सध्या जास्त निघत आहेत; आणि ललित वाङ्मयाचे दालन रिते रिते होत आहे; असे दृश्य आज दिसत आहे. कथा-कादंबऱ्यांचे प्रमाण फारच कमी झाले आहे. पूर्वी वर्षाला अडीचशे-तीनशे कादंबऱ्या निघत. गेल्या वर्षी स्वतंत्र कादंबऱ्यांची संख्या पन्नासपेक्षाही कमी आहे. कथासंग्रहांचीही तीच अवस्था आहे. आपल्या आवतीभवतीच्या वातावरणाचे चित्र कथा-कादंबऱ्यांमधून उमटत असते; समाजातील खटकणाऱ्या अस्वस्थ करणाऱ्या गोष्टींचे, त्यातून संयत-स्पष्ट चित्रण होत असते. समाजातील वास्तवाचा वेध कथा कादंबरीकार घेत असतात. आज टेलिव्हिजनमुळे सर्व काही रॉ स्वरूपात, जसेच्या तसे समोर येत असल्याने कथाकादंबरीतून ते मांडावे ही ऊर्मीच क्षीण होत आहे की काय, असा प्रश्न

पडतो. अमेरिकेतील कादंबरीकार हे बहुतांशी थ्रिलर्स, चित्तथरारक बेस्टसेलर्सच्या मागे लागलेले आहेत; बुकर पारितोषिकासाठी येणाऱ्या कादंबऱ्यांमध्ये ब्रिटनपेक्षा राष्ट्रकुलदेशातील लेखकांची संख्या जास्त दिसते; आणि सलमान रश्दी, अरुंधती रॉय (भारतीय), बेन ओक्री (नायजेरियन), मार्गरेट अॅटवुड (कॅनेडियन), व्ही.एस. नायपॉल (वेस्ट इंडीज), नादिन गोर्डिमेर (दक्षिण अफ्रिका), जे. एम. कोएत्झी (ऑस्ट्रेलिया), काझुओ इशिगुरो (जपानी) वगैरेंच्या कादंबऱ्यांतील अनुभवविश्वाच्या वेगळेपणाचे पाश्चात्यांना वाटणारे आकर्षण त्याद्वारे प्रकट होते.

नव्या दमाच्या कथा-कादंबरीकारांची नवी पिढी पुढे येण्याची गरज आहे. ज्यांच्या नव्या पुस्तकाची चातकाप्रमाणे वाट पाहावीशी वाटेल अशा नव्या नावांचीही आज गरज आहे. नवे प्रतिभावंत आज वृत्तपत्रीय लेखनात, दूरचित्रवाणीवरच्या मालिकांच्या लेखनात, अधिक पैसा आणि झटपट यश यांच्या मोहात अडकले जात आहेत; त्यामुळे कादंबरी सारखा दीर्घकाळ घेणारा वाङ्मयप्रकार हाताळण्याएवढी मानसिक उसंत त्यांना नाही. टीव्हीवरच्या मालिकांचे यश हे तात्पुरते असते; आणि ते यश केवळ संवादलेखक वा पटकथालेखक यांचे नसते. मूळ कल्पनेत आणि संहितेत सतत बदल होत असतात; त्यात निर्माता, दिग्दर्शक, सहकलावंत यांचाही हस्तक्षेप होत असतो. त्यामुळे निखळ वाङ्मयीन कृतीच्या निर्मितीने होणारा आनंद अशा पटकथांच्या लेखनातून मिळणे दुष्कर असते. परंतु आजची तरुण लेखकांची पिढी या माध्यमाकडे वळत आहे; आणि आपली सारी शक्ती त्यामध्येच गुंतवत आहे. त्यामुळे दूरचित्रवाणीचा फायदा होतोय खरा, पण मराठी साहित्याचे मात्र नुकसान होत आहे. प्रतिभावंतांची नवी पिढी कादंबरी - नाटकाऐवजी मालिकांचे लेखन, एकांकिकांचे लेखन अशा दुय्यम उद्योगातच आपली प्रतिभा खर्च करीत आहेत.

मराठी साहित्यक्षेत्र त्यांना मालिकालेखनाएवढी कमाई देऊ शकत नाही हेही एक वास्तव आहेच. बहुसंख्य कथाकादंबरीकारांना पुस्तकांच्या मानधनातून होणारी प्राप्ती हजार दोन हजार प्रतींशीच निगडित राहते. मालिकांचा एक एपिसोडही कधी कधी त्यापेक्षा जास्त कमाई करून देणारा ठरतो. 'वन लाइन स्टोरी'वरून चटपटीत संवाद लिहिले की झाले! कादंबरीला त्यापेक्षा दीर्घ बैठक लागते; अधिक आव्हानात्मक जबाबदारीला सामोरे जावे लागते. कादंबरी प्रसिद्ध झाल्यावरही ती गाजली, तिला पुरस्कार मिळाले, वाचकांनी तिला प्रतिसाद दिला तर लेखकाला थोडीफार भरघोस प्राप्ती होते. एरव्ही मोजकी उक्ती रक्कम घेऊन समाधान मानावे लागते.

तरीही कादंबरीलेखन, नाटकलेखन हे खरे वाङ्मयीन आव्हान असते; आणि त्यातून मिळणारे यश हे अधिक चिरस्थायी असते. त्या यशाची सर फुटकळ मालिकालेखनाला, वृत्तपत्रीय लेखनाला येत नाही, हे लक्षात घेऊन प्रतिभाशाली तरुणांनी या मोठ्या आव्हाना-कडेच वळायला हवे. फडके-खांडेकरांनी एकेकाळी वाचकवर्गाला जी मोहिनी घातली होती; तिची पुनरावृत्ती होईल असे काही नवे वर्तमानकालसंवादी लेखन व्हायला हवे. अशा नव्या प्रतिभेची आज गरज आहे.

**-संपादक**



## साहित्यवार्ता

### * 'शांतिदूत'चे प्रकाशन

महात्मा गांधी यांचे चरित्र व चारित्र्य 'सत्याग्रही शांतिदूत'मध्ये साध्या आणि सोप्या स्वरूपात मांडले आहे, असे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वि. मा. बाचल यांनी सांगितले.

त्र्यंबक चिटणीस यांनी महात्मा गांधी यांच्यावर कवितांच्या स्वरूपात लिहिलेल्या स्नेहवर्धन प्रकाशनाच्या 'सत्याग्रही शांतिदूत'या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. वि. मा. बाचल यांच्या हस्ते झाले, 'वनराई'चे अध्यक्ष मोहन धारिया अध्यक्षस्थानी होते. डॉ. बाचल म्हणाले, ''महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा, ईश्वरनिष्ठा इत्यादी मूल्ये स्वत: अनुभवली. त्यातून ते स्वत: घडत गेले आणि कोट्यवधींचे आयुष्य त्यांनी घडविले.''

श्री. धारिया म्हणाले, ''स्वातंत्र्यकाळात किंवा त्यानंतरही मी गांधीवादी होतो, असे म्हणता येणार नाही. पण आजच्या काळात गांधीजींचा विचार तारून नेईल असे मला आवर्जून वाटते. सध्या जमीन आणि माणसे पडीक होत चालली असताना, त्यांचा वापर कसा करायचा, याबाबत गांधीजींनी त्या काळात विचार व्यक्त केले होते. सध्या जगभर मानवता नष्ट करण्याचे प्रयत्न सुरू असताना अहिंसा आणि शांततेचा विचार करण्याची गरज आहे.''

आजच्या पिढीला महात्मा गांधी यांच्याबद्दल इतकी अनास्था का, असा प्रश्न पडतो. पण चूक आमचीच आहे. आम्हीच त्यांच्याबद्दलचे पद्धतशीरपणे आकलन मांडायला कमी पडलो, असे श्री. चिटणीस म्हणाले. प्रकाशक डॉ. स्नेहल तावरे यांनी आभार मानले.

### * 'भारतीय भाषांचा वापर माहिती तंत्रज्ञानात अपरिहार्य'

''तरुण वर्गाला स्वस्त, परिणामकारक व वेगवान पद्धतीने शिक्षण देण्यासाठी माहिती तंत्रज्ञानात भारतीय भाषांचा वापर अपरिहार्य आहे,'' असे महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत यांनी सांगितले.

रवींद्र देसाई व सुश्रुत कुलकर्णी यांनी लिहिलेल्या 'कॉम्प्युटर : दोस्त माझा मस्त' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले, संगणकतज्ज्ञ अच्युत गोडबोले, आनंद हर्डीकर आदी या वेळी उपस्थित होते. राजहंस प्रकाशनचे व्यवस्थापक तु. शं. कुंभार यांनी स्वागत केले.

### * अण्णा भाऊ साठे यांचे स्मारक

पुणे शहर हे देशात पहिल्या क्रमांकाचे शहर करण्यासाठी प्रयत्न होत असतानाच, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे स्मारकही पहिल्या क्रमांकाचे स्मारक होईल, यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. हे स्मारक समाजातील सर्व उपेक्षितांना प्रेरणा देणारे

ठरावे, अशी अपेक्षा खासदार सुरेश कलमाडी यांनी व्यक्त केली.

पुणे महापालिकेच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या स्मारकाचे भूमिपूजन ३ जुलै रोजी त्यांच्या हस्ते झाले.

### * बेस्ट बेकरी प्रकरणावरील पुस्तक

''न्याययंत्रणेतही जातीयवादाचा शिरकाव झाला तर राज्यघटनाच उद्ध्वस्त होईल. याचे गांभीर्य लक्षात घेऊन न्यायालयीन नेमणुकांवर जनतेचे नियंत्रण असले पाहिजे,'' असे प्रतिपादन माजी न्यायाधीश पी. बी. सावंत यांनी पुणे येथे केले. कायद्याचे नाटक करून जनतेच्या डोळ्यांत धूळफेक कशी करावी, हे गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्यापासून शिकावे, अशी टीकाही न्या. सावंत यांनी या वेळी केली.

गुजरातमधील 'बेस्ट बेकरी' प्रकरणावर प्रकाशित करण्यात आलेल्या 'बेस्ट बेकरी : सर्वोच्च न्यायालयाची मोदींना थप्पड' या पुस्तकाचे प्रकाशन न्या. सावंत यांच्या हस्ते झाले. इंग्रजीतही हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने 'बेस्ट बेकरी' प्रकरणी दिलेला निकाल; तसेच या प्रकरणासंदर्भात प्रसिद्ध झालेले विविध लेख यांचे संकलन या पुस्तकात करण्यात आले आहे. कोल्हापूर येथील श्रमिक प्रतिष्ठानने हे पुस्तक प्रकाशित केले असून गोविंदराव पानसरे व ॲड. मिलिंद कदम यांनी पुस्तकाचे संपादन केले आहे.

न्या. सावंत म्हणाले, ''बेस्ट बेकरी प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने जो निकाल दिला त्याला ऐतिहासिक, सामाजिक महत्त्व आहे. मोदी यांच्या शासनयंत्रणेवर विशेषत: पोलिस, गुन्हे अन्वेषण विभाग, सरकारी वकिलांची यंत्रणा आणि सत्र व उच्च न्यायालयात या प्रकरणी चाललेले खटले या सर्वांवर सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे मर्मभेदी प्रकाश पडला आहे. कायद्याचे नाटक करून जनतेच्या डोळ्यांत कशी धूळ फेकली जाते, याचा अभ्यास करायचा असल्यास प्रत्येकाने 'बेस्ट बेकरी' प्रकरणातला सर्वोच्च न्यायालयाचा निकाल वाचून पहावा,'

अन्वर राजन यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### * 'पुस्तकांबाहेरचे जीवनशिक्षणच महत्त्वाचे'

आजच्या अभ्यासक्रमावर धर्म, पंथ, प्रादेशिकता, जातीय अस्मिता, राजकारण या साऱ्यांचा मोठा प्रभाव असल्याने पुस्तकांबाहेरचे जीवनशिक्षणच अत्यावश्यक वाटू लागले आहे. पुस्तकांच्या चौकटीबाहेरचे शिक्षणच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वाची कामगिरी बजावणारे ठरत आहे. म्हणूनच यापुढे निर्मितीक्षमता आणि उपक्रमशीलता हे शिक्षणाचे मुख्य केंद्र व्हायला हवे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांनी व्यक्त केले.

एक शिक्षणसंस्था चालविणारा संस्थाचालक म्हणून मला अभय पाटीलच्या यशाचे कोतुक वाटते. कोकण हा नररत्नांची खाण आहे; पण मुंबई-पुण्याकडे गेल्यानंतरच या नररत्नांना पैलू पडतात. मात्र गेल्या काही वर्षांत कोकणात परिवर्तन होत आहे. विद्यार्थ्यांचे कुतूहल जागविणारे उपक्रम राबविण्यात आम्ही आमच्या शिक्षण संस्थेत यशस्वी ठरलो. ग्रामीण भागातील सर्वच शाळांत असे झाले पाहिजे. संस्थाचालक म्हणून विद्यार्थ्यांच्या



प्रगतिपुस्तकावर लक्ष न देता मी व्यक्तिमत्त्व विकासावर देतो. शिक्षण पारंपरिक पद्धतीने देत असताना आम्ही व्यक्तिमत्त्व विकासासाठी अनेक अपारंपरिक प्रयोग करतो. त्यामुळे विद्यार्थी पाठ्यपुस्तकाच्या चौकटीबाहेर जाऊन आजूबाजूचा निसर्ग, पशुपक्षी, माणसे, लोकसंस्कृती, गावाचे गावपण या सगळ्याकडे वेगळ्या दृष्टीने पाहू शकतो.

ते पुढे म्हणाले, काही वर्षांपूर्वी आम्ही परीक्षेत सुयश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख रकमेऐवजी आंबा, काजू, नारळाची कलमे बक्षीस म्हणून देत असू. यामागे अभ्यासाबरोबरच एखादे झाड मन लावून वाढविणे व त्यातून विद्यार्थ्यांच्या निर्मितीक्षमतेला, निरीक्षणाला व स्वावलंबनाला वाव मिळावा हा हेतू होता. पाठ्यपुस्तके आणि शाळेच्या चार भिंती या बाहेरच्या कृतिशील शिक्षणाकडेच मुले अधिक स्वारस्य दाखवितात. त्यामुळे एखादा विद्यार्थी ३५ ते ४० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाला तरी तो उत्तम शेतकरी बनू शकतो.

शाळेमध्ये कितीही उत्तम शिक्षण दिले, उत्तम उपक्रम राबवले तरी पालकांची जी जबाबदारी आहे, ती बहुसंख्य पालक उचलताना दिसत नाहीत. शाळेला भेट न देणे, विद्यार्थ्यांची चौकशी न करणे, ग्रामीण भागात तर मुलांना शाळेत घालून पालक मोकळे होतात. शाळेची पायरी कधीच चढत नाहीत. पालक-शिक्षक यांच्या भेटी सातत्याने होणे अगत्याचे आहे.

### * सोनोपंत दांडेकर स्मृतिदिन

''संतांच्या प्रस्तुततेचा विचार स्वच्छ मनाने आणि संप्रदाय व पंथांच्या पलीकडे जाऊन करण्याची गरज आहे. संतविचार अजूनही प्रस्तुतच आहेत,'' असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव यांनी व्यक्त केले.

स. प. महाविद्यालयाच्या सोनोपंत दांडेकर अध्यासनाने श्री. दांडेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात 'संतविचारांची समकालीन प्रस्तुतता' या विषयावर त्यांचे भाषण झाले. मुक्ता गरसोळे-कुलकर्णी यांनी लिहिलेल्या श्री. दांडेकर यांच्या संक्षिप्त चरित्राचे प्रकाशनही त्यांच्या हस्ते झाले.

प्रा. जाधव म्हणाले, ''संतवाङ्मय वैयक्तिक पातळीवर शाश्वतच आहे; पण संतांचा सामाजिक विचार, विद्रोह यांच्या प्रस्तुततेचा विचार समकालीन आणि उत्तरकालीन अशा दोन दृष्टींनी करण्याची गरज आहे. प्रस्तुततेचा शोध म्हणजे तुम्ही कोण आहात, याचा शोध घेण्याची प्रक्रिया असते. ते समाजाच्या जिवंतपणाचे लक्षण असते. अशा प्रकारे अंतर्मुख होण्याची क्षमता समाजात शिल्लक आहे, तोपर्यंत संतविचार प्रस्तुतच आहेत.''

अध्यासनाचे समन्वयक डॉ. प्रकाश सोमण यांनी प्रास्ताविक केले. डॉ. वैजयंती बेलसरे यांनी आभार मानले.

### * माणगाव येथील साने गुरुजी यांचे स्मारक

माणगाव येथे उभारण्यात आलेले साने गुरुजी स्मारक हे विखुरलेला समाज एकत्र आणण्यासाठीचे प्रेरणास्थान आहे, असे प्रतिपादन या स्मारकाच्या निधी समितीचे अध्यक्ष भाई वैद्य यांनी केले.

या स्मारकासाठी पुणे महापालिकेच्या शिक्षण मंडळाने १३ लाख ७० हजार रुपयांचा निधी गोळा केला आहे. त्याबाबत कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी नारायण पेठेतील गोगटे

प्रशालेत स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये हा निधी उभारण्यात मोठा वाटा उचललेल्या, महापालिकेतील शिक्षकांबरोबरच समितीचे अर्जुन डांगळे, किशोर पवार, उमेश कदम, सुधीर देसाई, डॉ. सतीश देसाई हेही सहभागी झाले होते.

या कार्यक्रमात श्री. वैद्य यांनी महापालिकेच्या शाळांमधून निधी उभारल्याबद्दल कौतुक केले. ते म्हणाले,''जागतिकीकरणाच्या वातावरणात प्रत्येकजण एकमेकाशी फटकून वागत आहे. त्यामुळे समाजात सुसंवाद घडविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. साने गुरुजींचे स्मारक हे काम पार पाडेल अशी अपेक्षा आहे.''

*** खांडेकर स्मृती संग्रहालयाला लोकसहभागाची प्रतीक्षा**

मराठी संस्कृतीचे भूषण ठरलेल्या ज्ञानपीठ विजेते वि. स. खांडेकर यांच्या स्मृती संग्रहालयाच्या उभारणीचा संकल्प केल्यानंतर शिवाजी विद्यापीठाने संग्रहालय परिपूर्ण आणि जास्तीत जास्त अर्थपूर्ण कसे करता येईल, या दिशेने विचार सुरू केला आहे. जागा आणि निधीचा प्रश्न सुटला असला तरी येथील संदर्भसाधनांची जमवाजमव पूर्ण झालेली नाही. प्रदर्शनाबरोबरच वि. स. खांडेकरांच्या जीवन व साहित्याच्या अभ्यासकांसाठी संदर्भ केंद्र उभारणीसाठी विद्यापीठाने वि. स. खांडेकर भाषा भवनाचे प्रशस्त दालन उपलब्ध करून दिले आहे. पहिल्या टप्प्याच्या बांधकामाच्या खर्चासाठी साडेसात लाख रुपयांच्या निधीची तरतूदही करण्यात आली आहे. वि. स. खांडेकर यांच्या कुटुंबियांनी ज्ञानपीठ सन्मानपत्र, वाग्वेदी मूर्ती, साहित्य अकादमी सन्मानचिन्ह, पद्मभूषण सन्मानचिन्ह, पदक, शिवाय खांडेकरांची ग्रंथसंपदा, त्यांचे लिखाण असलेली नियतकालिके, दैनिके, कात्रणे, काही हस्तलिखिते यांचबरोबर त्यांच्या वापरातल्या वस्तूही दिल्या आहेत.

पुणे आकाशवाणीकडे असलेली खांडेकरांची भाषणे आज दुर्मिळ ठरली असून या ध्वनीफितींचा सगळा संग्रह आकाशवाणीने स्मृती संग्रहालयाला दिला आहे. सिनेसाधन संग्राहक शशिकांत किणीकर यांनी वि. स. खांडेकर लिखित पटकथा पुस्तिका व चित्रपट छायाचित्रांच्या प्रतिलिपी उपलब्ध करून दिल्या आहेत. डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्याजवळील अप्रकाशित व असंकलित साहित्यही संग्रहालयाला मिळाले आहे.

असे असले तरी संदर्भ साधने गोळा करण्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. खांडेकर यांच्या साहित्यकृतींवरील परीक्षणे, व्यक्तिगत आठवणी, संबंधित व्यक्तींची नावे-पत्ते, छायाचित्रे यांचा संग्रहालय परिपूर्ण करण्यासाठी गरज आहे. खांडेकरी साहित्यप्रेमी व भाषाप्रेमींनी आपल्याकडे जतन केलेली अशी साधने देऊन या कामास हातभार लावावा, असे आवाहन संग्रहालयाचे संचालक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या वतीने केले आहे.

दृक्-श्राव्य साधनांद्वारे खांडेकरांचा जीवनपट तसेच वाङ्मयीन कारकीर्द साकारण्यासाठी हातभार लावावा, अशी विनंती करण्यात आली आहे. संपर्क - संचालक, वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय, वि. स. खांडेकर भाषा भवन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४. दूरध्वनी : ०२३१ - २६९०५७१

*** मराठी रंगभूमीसाठी पुण्यातही नाट्यअकादमी हवी**

केवळ कलाकारच नाही तर लेखक, दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक अशा विविध माध्यमातून मराठी नाटकाचे हिंदी चित्रपटसृष्टीतले योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यामुळे मराठी रंगभूमी जिवंत ठेवण्यासाठी फिल्म इन्स्टिट्यूटच्या धर्तीवर पुण्यात नाट्य अकादमी स्थापन होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री सुनील दत्त यांनी केले.

ज्येष्ठ रंगकर्मी चिंत्तरंजन कोल्हटकर आणि सुधा करमरकर यांना अनुक्रमे २००२-०३ आणि २००३-०४ या वर्षांसाठीचे नाट्यगौरव पुरस्कार देऊन दत्त यांच्या हस्ते गौरवण्यात आले.

चित्रपटापेक्षाही रंगभूमीचे माध्यम हे अधिक कठीण आहे. रंगभूमीच्या माध्यमातून सामाजिक समस्या मांडण्याचे कार्य मराठी रंगभूमीने केले आहे. अशा मराठी रंगभूमीवरील बुजुर्ग कलाकारांनी या अकादमीच्या माध्यमातून युवा पिढीतले उत्तमोत्तम कलाकार निर्माण करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. चित्रपट संग्रहालयाच्या धर्तीवर आजवरच्या सर्व मराठी नाटकांचाही अमूल्य ठेवा जत करून ठेवला तर निश्चितच त्याचा फायदा युवा पिढीस होऊ शकेल, असेही त्यांनी सांगितले.

पेन्शन मिळण्यासाठी सरकारकडे अर्ज करायला लागणे ही कलाकारासाठी अपमानास्पद बाब आहे. त्यामुळे पेन्शन देण्यासाठी एखाद्या समितीची स्थापना करून तिच्या शिफारशीनुसार कलाकारांची निवड करण्यात यावी, अशी अपेक्षा चित्तरंजन कोल्हटकर यांनी व्यक्त केली.

*** वाचनप्रिय तरुणांचे आधुनिक 'अड्डे'**

शांत वातावरण... सुमधुर संगीत..... हजारो पुस्तके.... त्यांची व्यवस्थित मांडणी आणि यामुळे दिसणारी युवकांची वाढती संख्या. 'पाथ फाईंडर', 'क्रॉसवर्ड' यासारख्या पुस्तकांच्या दुकानांना भेट दिल्यास हल्ली हे चित्र हमखास पाहावयास मिळते.

या पुस्तकांच्या दुकानांकडे युवकांचा कल वाढत चालला असल्याचे दिसते. काही जण येथे येऊन पुस्तक चाळतात, तर काही विकत घेतात. काहींच्या नजरा त्यांना हवे ते पुस्तक शोधत असतात. या पुस्तकांच्या दुकानांस भेट दिल्यास येथील पुस्तक भांडार पाहून थक्क तर व्हायला होतेच, शिवाय युवकांची वाचनाची आवड, नवीन ज्ञान मिळविण्याची धडपडदेखील कळू शकते.

'पाथफाईंडर', 'क्रॉसवर्ल्ड' येथे पुस्तकांबरोबरच कॅसेट, सीडीजदेखील ठेवलेल्या असतात. यामुळे देखील येथे युवकांचे येण्याचे प्रमाण अधिक असते. या दुकानांमध्ये पुस्तक वाचण्यात मग्न असलेल्या रश्मी एक्का हिने सांगितले, ''मी इथे आठवड्यातून एकदा तरी येऊन जाते. मंद संगीत ऐकत येथे पुस्तक चाळण्यात काही वेगळीच मजा असते. तसेच, विविध मासिके, संदर्भ पुस्तके येथे बघावयास मिळतात. विशेषतः मी येथून कादंबऱ्या विकत घेते.''

मेधा शिदोरे ही विद्यार्थिनी या दुकानांना सतत भेट देते. विविध प्रकारची माहिती मिळविण्यास, सामान्य ज्ञान वाढविण्यासाठी येथे येत असल्याचे तिने सांगितले. एखादे पुस्तक विकत घेण्यापूर्वी अनेक नवीन पुस्तके, त्यांचे लेखक समजू शकतात. येथील पुस्तकांचा संग्रह अतिशय चांगला असतो. असे तिचे म्हणणे आहे.

## * सूर गवसलेला कवी

''सूर गवसलेला कवी वाचकांच्या आवडीचा बनतो,'' असे मत पुणे विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. नागनाथ कोतापल्ले यांनी ४ जुलै रोजी व्यक्त केले.

सौ. सुप्रिया वकील यांच्या 'उत्सव' काव्यसंग्रहाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते करवीरनगर वाचनालयात झाले.

श्री. कोतापल्ले म्हणाले, ''कवींनी जीवनात दहा-पंधरा कविता चांगल्या लिहिल्या तरीही त्यांच्या जीवनाचे सार्थक होते. विशिष्ट परिस्थिती आणि काळातील कविता असल्या तरीही त्यांच्या वेगळेपणामुळे त्या वाचकांच्या आवडीच्या बनतात. कविता लिहिताना कवीला सूर सापडणे महत्वाचे आहे. हा सूर ज्या कवीला गवसला, तो लवकर वाचकांच्या आवडीचा बनतो. निसर्गाचा आविष्कार, त्यातील रंगांची उधळण शब्दबद्ध करून संवेदनशीलतेचा अनुभव सौ. वकील यांनी उत्तमप्रकारे मांडला आहे. कविता साधी, सोपी नसते. कवितांमध्ये रसिकांचे अंत:करण छेडण्याचे सामर्थ्य असते.''

प्रा. कमलाकर दीक्षित म्हणाले, ''कवितांचा आकार लहान असतो; मात्र त्यातील अर्थ मोठा असतो. कल्पनेच्या पाऊलखुणा कवितेतून शब्दबद्ध करता येतात.''

मनोगत व्यक्त करताना सुप्रिया वकील म्हणाल्या, ''जीवनातील जाणीवेतून उतरलेले रंग शब्दांत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. हा दुसरा कवितासंग्रह प्रकाशित करताना फार आनंद होत आहे. यापूर्वी १९९७ मध्ये प्रकाशित झालेल्या 'मैफल'नंतर आजचा हा क्षण स्मरणात राहणारा आहे. निसर्गाशी सुसंवाद साधत असताना सुचलेल्या कल्पना संग्रहरूपात 'उत्सव' काव्यसंग्रहातून प्रकाशित केल्या आहेत.''

रवींद्र ठाकूर, श्रीकांत डिग्रजकर, राम कुंभोजकर, मंदा कदम, अनुराधा गुरव, सुनीलकुमार लवटे आदी उपस्थित होते.

यावेळी विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार मिळाल्याबद्दल महादेव मोरे आणि अनंत काणेकर



*डावीकडून अनिल मेहता, नागनाथ कोत्तापल्ले, कमलाकर दिक्षीत, व सुप्रिया वकील*



पुरस्कार मिळाल्याबद्दल चंद्रकांत नलगे यांचा सत्कार करण्यात आला. अनिल मेहता यांनी प्रास्ताविक केले. अनिल वकील यांनी स्वागत केले. नीना मिस्त्री यांनी सूत्रसंचालन केले.

## * 'स्केचिंग'चे प्रकाशन

'चित्रकाराच्या मनातील आकार कमीतकमी वेळात व कमीतकमी रंगात उतरवण्याची कला म्हणजे स्केचिंग असे ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे यांनी सांगितले. चित्रकार सुधाकर खासगीवाले यांच्या 'स्केचिंग' या पुस्तकाच्या १८ व्या आवृत्तीचे प्रकाशन मोहन धारिया यांच्या हस्ते झाले. प्रदर्शनाचे उद्घाटन रवी परांजपे यांच्या हस्ते झाले.

रेखांकन (स्केचिंग) आणि चित्रांकन (ड्रॉईंग) या दोन सर्वस्वी भिन्न संकल्पना आहेत. या कलेचा विकास करत असतानाच चित्रकाराची सौंदर्यदृष्टीही अधिक प्रगल्भ व्हायला हवी. चित्रकार हा त्यांच्या चित्रातील रेषांमधून स्वत:चाच शोध घेत असतो आणि चित्रकाराने काढलेली चित्रे हे त्याचे रेषात्मक आत्मचरित्रच असते, असे ते म्हणाले.

आपल्या पुस्तकाविषयी बोलताना चित्रकार व लेखक सुधाकर खासगीवाले यांनी त्यांच्या आयुष्यात आलेल्या अनेक अडचणींचा उल्लेख केला. या अडचणींना 'इष्टापत्ती' समजून आपण आपला कलाप्रवास केला असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. वि. मा. बाचल यांनी सांगितले की, ही चित्रे खासगीवाले यांच्यासारख्या सात्त्विक माणसाने काढल्याने त्यात नावालाही अश्लीलता व बीभत्सता नाही.

## * बिल क्लिंटन यांच्या 'माय लाईफ'ची तडाखेबंद विक्री

अमेरिकेचे माजी अध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या 'माय लाईफ' या आत्मचरित्रात्मक पुस्तकाची तडाखेबंद विक्री होत असून या पुस्तकाच्या आतापर्यंत १० लाख प्रती विकल्या गेल्या आहेत. या पुस्तकाची सध्या तिसरी आवृत्ती काढण्यात येत आहे. या पुस्तकाच्या सुमारे २६ लाख प्रती खपतील असा अंदाज आहे. पुस्तक प्रकाशनाच्या वेळी ४ लाख प्रती खपल्या होत्या. या पुस्तकासाठी केएनओपीएफ या प्रकाशनाने क्लिंटन यांना तब्बल १० दशलक्ष डॉलर्स देऊ केले. क्लिंटन यांची पत्नी हिलरी यांच्या 'लिव्हिंग हिस्टरी' या आत्मचरित्रात्मक पुस्तकाचीही तडाखेबंद विक्री झाली होती व या पुस्तकाच्या २३ लाख प्रती खपल्या होत्या. सध्याचे वातावरण बघता बिल क्लिंटन हिलरींना मागे टाकणार असे दिसत आहे.

## * 'आम्ही अन आमचा बाप'च्या अनुवादांचे पंतप्रधानांच्या हस्ते प्रकाशन

'आम्ही अन आमचा बाप'या मराठी पुस्तकाच्या हिंदी, पंजाबी, कन्नड आणि तामिळ आवृत्यांचे प्रकाशन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या हस्ते येत्या सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये दिल्लीत होत आहे. या जगभर गाजलेल्या पुस्तकाचे लेखक आणि प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांना पंतप्रधानांच्या हस्ते हे प्रकाशन होत असल्याचा खूप आनंद झाला आहे. 'एक निगर्वी, संयमी आणि ऋषितुल्य कर्मयोग्याच्या हस्ते आपल्या कामाला दिलेली ही पोचपावती आहे', अशा शब्दात त्यांनी भावना व्यक्त केल्या.

'आम्ही अन आमचा बाप'ची 'आउटकास्ट'ही इंग्रजी आवृत्ती, तसेच 'इ दू शोबो'ही फ्रेंच आवृत्ती, स्पॅनिश भाषांमधली त्याची भाषांतरे येत असताना त्यापाठोपाठ येत्या डिसेंबरपर्यंत बंगाली, उडिया, तेलगू आणि मल्याळम भाषातील 'अनुभवांतर'ही बाजारात येत आहेत.

गुजराथी भाषेत हे पुस्तक यापूर्वीच आले असून मुंबई विद्यापीठासह अमेरिकेतील हॉवर्ड विद्यापीठ, जॉन हॉपकिन्स सोसायटी तसेच येल विद्यापीठात हे पुस्तक समाजशास्त्रीय संदर्भ साहित्य म्हणून उपयोगी ठरले आहे.

*** 'श्यामची आई' सीडीवर**

मराठी चित्रपटांना गर्दी होत असल्याचे आनंददायी दृश्य सध्या दिसते आहे. परंतु एकूण विचार केला तर मराठी भाषेच्याच अस्तित्वाचा प्रश्न हळूहळू गंभीर होत जाईल अशी चिन्हे आहेत. 'मराठी'ला व्यावसायिक महत्त्व प्राप्त करून देणे, मराठी चित्रपट, साहित्य, संगीत यांचा 'ग्राहक' तयार होणे गरजेचे आहे. याच विचारातून 'रुद्रा व्हिडीओ'ने 'श्यामची आई' या अभिजात चित्रपटाची व्हिडीओ सीडी बाजारात आणली असून, प्रत्येक मराठी घरात ती पोहोचावी अशी धडपड सुरू आहे.

'श्यामची आई'ला १९५३ साली उत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. त्यानंतर गेल्या पन्नास वर्षांत एकही मराठी चित्रपट हा बहुमान प्राप्त करू शकलेला नाही. साने गुरुजी यांनी तुरुंगात असताना केवळ पाच दिवसांत 'श्यामची आई' लिहून पूर्ण केले होते. सदाचाराच्या संकल्पनाच आज बदलू पाहात आहेत, अशा वेळी अनेकांना 'श्यामची आई' बाळबोध वाटण्याची शक्यता आहे. लहान मुलांचे भावविश्व आणि समजाची पातळीही वाढलेली, तो निरागसपणा आता उरलेला नाही. मात्र तरीही 'श्यामची आई'द्वारे होणारे चांगुलपणाने, परोपकाराचे संस्कार आताही तेवढेच महत्त्वाचे आहेत. अतिशय वाचकप्रिय ठरलेल्या त्या कादंबरीला आचार्य अत्रे यांनी चित्रपटरूपात सादर केले व हा चित्रपटही प्रचंड यशस्वी ठरला होता. माधव वझे, वनमाला, बाबुराव पेंढारकर, उमेश, सुमती गुप्ते यांच्या त्यात भूमिका होत्या. पुस्तकातील प्रतिमाच जणू अत्र्यांनी पडद्यावर तंतोतंत साकारल्या होत्या. चित्रपटाचा सततचा बोधप्रद पवित्रा, भाबडे प्रसंग आणि कनिष्ठ मध्यमवर्गीय संस्कार हा महाराष्ट्राचा एक प्रकारे सामाजिक इतिहास आहे. त्यांची कालातीतता ठरविण्यापेक्षा त्यातून सदाचाराचे महत्त्व आणि गरज ठसविण्याचा होणारा प्रयत्न पाहणे अधिक आवश्यक आहे. 'रुद्र व्हिडीओ'ने 'श्यामची आई'ला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात हा प्रचार व प्रसार हाती घेतलेला आहे. माधव वझे व वनमालाबाई या प्रयत्नात सहभागी होणार असून वर्षभर शाळांमधून कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

*** धर्मनिरपेक्षतेला धर्मनियमन पर्याय ठरू शकेल**

''भारतामध्ये धर्मनिरपेक्षता शक्य नाही. धर्मनिरपेक्षतेला धर्मनियमन हा पर्याय ठरू शकेल,'' असे मत डॉ. गो. पु. देशपांडे यांनी ४ जुलै रोजी व्यक्त केले. यासंदर्भात विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचारांचा आधार घेतला जाऊ शकेल, असेही ते म्हणाले.

'सामाजिक परिवर्तन मंच'ने 'नव्या धर्मनिरपेक्ष केंद्र सरकारपुढची आव्हाने' या विषयावर चर्चासत्र घेतले. ''देशामध्ये धर्मनियमन कसे करावे हा आताच्या आघाडी सरकारपुढे महत्त्वाचा प्रश्न आहे,'' असे देशपांडे यांनी सांगितले. धर्मभावनेचे स्वरूप जातीय भावनेशी निगडित असल्याने सध्या देशामध्ये धर्मसापेक्ष सरकारे येऊ लागली आहेत. पण याला आंतरराष्ट्रीय राजकारणही जबाबदार आहे. भाषा, संस्कृती, साधनसंपत्ती साऱ्याचाच ऱ्हास होत असल्याने धार्मिक मूलतत्त्ववाद वाढत आहे.



या चर्चासत्रामध्ये डॉ. अरुण टिकेकर, निवृत्त न्यायमूर्ती आर. ए. जहागिरदार यांनीही भाग घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प. मंगुडकर होते. द. प्र. नाईकनवरे यांनी संयोजन केले.

*** रुप तुझं जवसीच्या फुलावानी प्रकाशित**

बांधवी या मराठी महिला वाचकाच्या व्यासपिठाच्या संस्थापकीय सदस्य व वनस्थळी मासिकाच्या कार्यकारी संपादिका शलाका किरण ठाकूर यांनी संपादित व संकलित केलेला ओव्या व लोकगीतांचा संग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे.

आपल्या संस्कृतीचा ठेवा असलेलं काव्य विस्मृतीत जाऊ नये यासाठी अनेकांनी केलेल्या प्रयत्नातच आपलाही काही वाटा असावा या भावनेतून लेखिकेने हे काम तळमळीने केले आहे.

आपल्या आई, बहीण, व मागील पिढीतील स्त्रियांच्या तोंडून ऐकलेल्या ओव्या, भजनं व इतर लोकगीते या संग्रहात समाविष्ट केली आहेत.

या काव्यातील गेयता रसिकांना मोहून टाकणारी आहे.

*** स्वस्त शिक्षणासाठी माहिती-तंत्रज्ञानाचा वापर अपरिहार्य**

येत्या दशकात देशातील ५५ टक्के लोकसंख्या विशीच्या आतील असल्यामुळे परवडणारी, वेगवान तरीही स्वस्त शिक्षणासाठी माहिती-तंत्रज्ञानाचा वापर अपरिहार्य होणार आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत यांनी केले.

त्यांच्या हस्ते इयत्ता पाचवी आणि सहावीच्या 'कॉम्प्युटर-दोस्त माझा मस्त' या राजहंस प्रकाशनाच्या पुस्तकाचे प्रकाशन रमणबाग प्रशालेत झाले. रवींद्र कुलकर्णी आणि सुश्रुत कुलकर्णी यांनी लिहिलेल्या या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी प्रसिद्ध संगणकतज्ज्ञ अच्युत गोडबोले उपस्थित होते. राजहंस प्रकाशनाचे संपादक आनंद हर्डीकर आणि व्यवस्थापक तु. शं. कुंभार यांनीही आपले विचार मांडले.

स्वस्त पण उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी लहानपणापासून 'संगणक साक्षरते'चे महत्त्व पटवून देणाऱ्या सुबोध सोप्या मायबोलीत कम्प्युटरवरील या पुस्तकाचे मोल मोठे आहे, असे श्री. सावंत यांनी सांगितले. ''माहिती तंत्रज्ञान म्हणजे संगणक, संपर्क आणि आशय यांचा त्रिवणी संगम असून सर्वसामान्य जनतेला त्यातून ज्ञानोपासक बनवण्याचा प्रयत्न व्हायला हवा.''

माहिती तंत्रज्ञानात भारत सुपरपॉवर होण्यासाठी संगणकाचे शिक्षण तळागाळात पोहोचले पाहिजे. त्यामुळे भारतीय कम्प्यूटर उत्पादनासाठी जागतिक बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी कम्प्यूटरचे परिपूर्ण ज्ञान विद्यार्थ्यांनी घेतले पाहिजे, असे गोडबोले यांनी सांगितले.

*** शिवाजी-औरंगजेब यांच्यातील लढा राजकीय**

छत्रपती शिवाजी महाराज व औरंगजेब यांच्यातील लढा हिंदू विरुद्ध मुस्लिम असा नव्हता, तर तो राजकीय होता. या लढ्याकडे धार्मिक अंध दृष्टीने न पाहता सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीने पाहिले पाहिजे, असे मत पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रपाठक डॉ. राजा दीक्षित यांनी व्यक्त केले.

'हिंदू-मुस्लिम एकता के प्रतीक छत्रपती शिवाजी और शहेनशाह औरंगजेब' या मिर्झा हमीद बेग लिखित पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. वाडिया महाविद्यालयाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. एच.एम. शेख कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

छत्रपती शिवाजी हे राजेशाही व सरंजामशाही काळातील होते. परंतु त्या काळातही लोकशाही नसताना लोककल्याणकारी राज्य त्यांनी केले आणि हेच त्यांच्या श्रेष्ठत्वाचे गमक आहे, असे सांगून डॉ. दीक्षित म्हणाले की, हिंदू-मुस्लिम ऐक्यात धर्मसहिष्णुता दुर्मिळ आहे. परंतु त्या काळात शिवाजी महाराज ज्या धर्मसहिष्णुतेने वागले ती आजही अनुकरणीय आहे.

शिवाजी महाराज व औरंगजेब हे भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहेत. परंतु आपण त्यांना धर्माचे, तेढीचे प्रतीक केले. या दोघांचे कार्य चरित्र पाहिले तर व्यापक भारतीय संस्कृती दिसून येते. परंतु सध्या ही संस्कृती नष्ट होत आहे. या काळात मिर्झा बेग यांचे हे पुस्तक महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी व औरंगजेब यांच्याकडे माणूस म्हणून पाहिले तर तिरस्काराची भावना दूर होईल, असे मत डॉ. शेख यांनी व्यक्त केले.

*** पुस्तके परत घेतानाही 'बालभारती'ला हवे 'चहापाणी'!**

''तुमचं मंडळाकडे खाते नाही. तरीही आम्ही धनादेश जारी करीत आहोत. पण, त्यासाठी प्रत्यक्ष भेटून जरा 'चहापाण्या'ची सोय तुम्हाला करावी लागेल...''

....ही मागणी आहे राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, अर्थात 'बालभारती'ची!

मोफत पाठ्यपुस्तक योजनेमधून पुस्तके मिळण्यास विलंब झाल्याने सध्या विद्यार्थी-पालक हवालदिल झाले असून राज्यभर आंदोलने सुरू आहेत. शैक्षणिक वर्ष सुरू होण्यास काही दिवसच राहिले असताना ही योजना जाहीर करण्यात आल्यामुळे पुस्तकविक्रेतेही कोंडीत सापडले होते. त्यावर तोडगा म्हणून विक्रेत्यांकडील पुस्तके परत घेण्यात येणार असल्याचे राज्य शासनाने जाहीर केले. त्यासाठी सात जून ही मुदत देण्यात आली. राज्यभरातील विक्रेत्यांनी आपल्याकडील साठा मंडळाला परत केला. मात्र, त्यासाठी त्यांना द्राविडी प्राणायाम करावा लागला.

विक्रेत्यांकडील साठा तपासून तो परत घेण्यायोग्य आहे, असे प्रमाणपत्र मंडळाच्या भांडाराकडून मिळवावे लागले. त्याचप्रमाणे आपला क्रमांक लवकरात लवकर यावा, यासाठीही 'मेहनत' घ्यावी लागली. आता पुस्तके परत करून एक महिना झाला, तरी मंडळाकडून त्याचा धनादेश प्राप्त झालेला नाही. मोफत पुस्तक योजनेमुळे विक्रीला फटका बसला आहे, त्यातच मंडळाकडून धनादेश न मिळाल्याने विक्रेते हवालदिल झाले आहेत. पुण्यासह बाहेरगावचे विक्रेते धनादेश मिळविण्यासाठी मंडळाकडे खेटे घालत आहेत.

काही विक्रेत्यांनी सांगितले की पुस्तक परत घेताना पन्नास-शंभर रुपये 'बक्षिसी' द्यावी लागली. धनादेशासाठी चौकशी केली, तर मंडळाकडून उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. पूर्वीच्या पद्धतीनुसार नियमित विक्रेत्यांचे मंडळाकडे खाते होते. त्याद्वारे आर्थिक व्यवहार केले जात. पुस्तके परत घेण्याची योजना शासनाने जाहीर केल्यामुळे मंडळाकडे खाते नसलेल्या विक्रेत्यांनीही मोठ्या संख्येने पुस्तके परत केली. पुस्तक परत घेताना खाते उघडण्यासंदर्भात माहिती देण्यात आली नव्हती. आता खाते उघडण्यासाठी 'दक्षिणा' मागण्यात येत आहे. त्याप्रमाणे धनादेश जारी करण्यासाठी 'चहापाण्या'साठी काहीतरी द्यावे लागेल, असे सांगण्यात येत आहे, अशा शब्दांत विक्रेत्यांनी मंडळाकडून होणाऱ्या अडवणुकीबद्दल प्रतिक्रिया व्यक्त केली.

*** पुस्तके मारताहेत वर्गांमधून उड्या!**

घंटा होते. तास संपतो. हजेरीपत्रक, डस्टर-खडूबरोबरच शिक्षिका मुलांना पुस्तके गोळा करण्यास सांगतात आणि पुढील वर्गावर रवाना होतात...

...गोंधळून जाऊ नका. सध्या शाळांमध्ये हेच 'वेळापत्रक' पाळले जात आहे!

राज्य शासनाने जाहीर केलेल्या मोफत पाठ्यपुस्तक योजनेमुळे अनुदानित शाळांचे संस्थाचालक, मुख्याध्यापक आणि विद्यार्थी-पालक यांची सध्या रोजच परीक्षा पाहिली जात आहे. राज्यातील सुमारे साडेनऊ कोटी विद्यार्थ्यांमध्ये सर्व पुस्तकांचा संच मिळालेला विद्यार्थी अभावानेच आढळेल, अशी परिस्थिती आहे. म्हणूनच पुस्तकांचा हा तुटवडा आणि अभ्यासाचा बोजा यांचे गणित जुळविताना शिक्षकांची कसरत होत आहे.

सर्व विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध व्हावीत, यासाठी शहर व परिसरामधील शाळांना वेगवेगळ्या युक्त्या शोधून काढाव्या लागत आहेत. काही शाळांमध्ये तास संपला, की त्या वर्गातील पुस्तके गोळा करून दुसऱ्या वर्गावर जाताना शिक्षक ती पुस्तके घेऊन जात आहेत. काही शाळांमध्ये दोन-तीन विद्यार्थ्यांना एक पुस्तक देऊन 'सहकारा'ची बीजे रोवली जात आहेत. काही शाळांनी शिक्षक-विद्यार्थ्यांच्या 'लेखनकौशल्या'ची परीक्षा पाहण्याचे ठरविले असून उपलब्ध पाठ्यपुस्तकातील पूर्ण धडे, उतारे फळ्यावर लिहून काढण्यात येत आहेत. याशिवाय छोटी-मोठी सुटी आणि स्वयंअध्ययनाच्या तासामध्ये पुस्तकांची देवाणघेवाण करून अभ्यास भरून काढण्यात येत आहे.

*** साहित्य संस्कृती मंडळाला ग्रंथांच्या पुनर्मुद्रणासाठी २५ लाख!**

'महात्मा जोतिबा फुले : समग्र वाङ्मय', 'क्रांतिसूर्य राजर्षि शाहू महाराज', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ', 'सावित्रीबाई फुले : काल आणि कर्तृत्व', 'अण्णाभाऊ साठे : निवडक वाङ्मय' हे अत्यंत मागणी असलेले परंतु गेली काही वर्षे उपलब्ध नसलेले ग्रंथ लवकरच वाचकांच्या हाती पडणार आहेत. साहित्य संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेल्या या व अशा अन्य महत्त्वाच्या ग्रंथांच्या पुनर्मुद्रणासाठी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी मंडळास २५ लाख रुपयांचे अनुदान मंजूर केले आहे.

साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष, रा. रं. बोराडे यांनी सांगितले की, 'सरकारकडून दरवर्षी मंडळाला जे १५ ते १६ लाख रु. अनुदान मिळते ते नव्या ग्रंथांच्या प्रकाशनासाठीच खर्च होते. त्यातून मंडळाच्या जुन्या ग्रंथांचे पुनर्मुद्रण करणे शक्य होत नाही. त्यामुळे पुनर्मुद्रणासाठी आवश्यक रकमेची विशेष तरतूद करण्याची मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली असता त्यांनी २५ लाख रुपये मंजूर केले. फुले, आंबेडकर, शाहू महाराज आणि अण्णाभाऊ साठे यांची पुस्तके छापायला सरकारकडे पैसे नाहीत, अशी चर्चा होणेही बरोबर नव्हते. ही रक्कम वाढवताही आली असती पण या आर्थिक वर्षातच ती खर्च

करणे बंधनकारक असल्यामुळे आपण मर्यादित उद्दिष्ट ठेवले व मौलिक आणि अतिशय मागणी असलेली काही पुस्तके पुनर्मुद्रणासाठी निवडली. त्यामुळे ३१ मार्चपर्यंत आम्ही निश्चित केलेली पुस्तके प्रकाशित करणार आहोत.'

या अनुदानाअंतर्गत पुनर्मुद्रित करायच्या अन्य पुस्तकांमध्ये 'श्रीनामदेव गाथा', 'भावार्थ रामायण'(श्री एकनाथ महाराज विरचित) खंड पहिला, 'महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड' भाग-२ (इ. स. १७०८ ते १८१८), जयंत नारळीकर लिखित 'खगोलशास्त्राचे विश्व' आणि डॉ. चंद्रकांत हाटे लिखित 'स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री' या पुस्तकांचा समावेश आहे. पैकी 'महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड' हा डॉ. वि. गो. खोबरेकर यांचा ग्रंथ १९८८ साली प्रकाशित झाला असल्यामुळे आणि इतिहासाकडे बघण्याच्या लोकांच्या दृष्टिकोनात झालेल्या बदलामुळे या ग्रंथातील मजकुराची इतिहासाच्या अभ्यासकांकडून नव्याने छाननी करून नंतरच तो प्रकाशित करण्यात येईल, असे बोराडे यांनी सांगितले.

*** नामदार गोपाळकृष्ण गोखले**

नामदार गोपाळकृष्ण गोखले यांनी पुण्यात काढलेल्या हिंद सेवक समाज (सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी) या संस्थेने जूनमध्ये शंभराव्या वर्षात पदार्पण केले. 'देशसेवतून ज्ञानार्जन' या प्रेरणेतून उभ्या राहिलेल्या या संस्थेची वाटचाल त्याच मार्गाने सुरू आहे, हे 'धनंजयराव गाडगीळ ग्रंथसंग्रहालय' आणि 'गोखले अर्थशास्त्र-राज्यशास्त्र संस्था' यांच्या कामातून आजही प्रतीत होते.

देशाच्या आर्थिक-सामाजिक प्रश्नांचा सखोल अभ्यास करणाऱ्या कार्यकर्त्यांचा संच घडविणे, हे गोखल्यांचे स्वप्न होते. पुण्यात फर्गसन महाविद्यालय टेकडीच्या दक्षिणेची माळावरील जागा निवडून १२ जून १९०५ रोजी त्यांनी प्रारंभीच्या सभासदांच्या नावाची कोनशिला बसविली. ३ हजार ५०० रुपयांना ही जागा त्यांनी विकत घेतली, तर इमारत आणि ग्रंथसंग्रहासाठी रतन, टाटा, आगाखान अशा काहींनी त्यांना उदारपणे द्रव्यसाहाय्य केले. खुद्द दादाभाई नौरोजी यांनी ब्रिटनच्या पार्लमेंट कामकाजाची कागदपत्रे येथील ग्रंथालयासाठी दिली. 'इतिहास अभ्यासणारीच नव्हे, तर घडविणारीही' अशी संस्थेची ओळख उत्तरोत्तर ठळक होत गेली. त्यात ग्रंथालयाचा वाटा मोठा आहे. ग्रंथालयाच्या स्थापनेनंतर २५ वर्षांनी 'गोखले अर्थशास्त्र - राज्यशास्त्र संस्था' सुरू झाली.

सध्या सामाजिक शास्त्रांवरील २ लाख ६० हजार पुस्तके 'धनंजयराव गाडगीळ ग्रंथालया'त आहेत, अशी माहिती विद्यमान ग्रंथपाल श्रीमती गद्रे यांनी दिली. ग्रंथसंग्रहाशिवाय केंद्र व राज्यांचे अर्थसंकल्प, घटना समितीतील चर्चा, सरकारनियुक्त समित्यांचे अहवाल, कुलवृत्तान्त, ब्रिटिशकाळापासूनची गॅझेट, १८७२ ते २००१ या काळातले सर्व जनगणना अहवाल (सेन्सस) अशी मूल्यवान सामग्री या ग्रंथालयात आहे.

*** सद्‌गुरु मामासाहेब देशपांडे ग्रंथालयाचे नवीन वास्तूत पदार्पण**

वाचनाची अभिरुची जोपासण्याचे सर्जनशील कार्य करणारे आनंदनगर येथील श्रीपाद सेवा मंडळ संचालित 'प.पू.सद्‌गुरु श्री. मामासाहेब देशपांडे ग्रंथालय' नवीन वास्तूत पदार्पण करीत आहे. ग्रंथालयाची यशस्वी वाटचाल पाहून, 'ग्रंथालय संचालनालय मुंबई' यांनी ग्रंथालयाला 'ब' वर्ग देऊन मान्यता दिली आहे.

अत्यल्प वर्गणी असलेल्या या ग्रंथालयात अनेक दुर्मिळ ग्रंथ, संदर्भग्रंथ, वेदोपनिषदे, संस्कृत भाषेतील ग्रंथ, आयुर्वेद - ज्योतिषशास्त्र, कला-क्रीडा क्षेत्रांतील मान्यवरांची चरित्रे, ललित वाङ्मय कथा, कादंबऱ्या, नाटके, काव्यसंग्रह, ललितलेख, निबंध तसेच समीक्षा ग्रंथ, दर्जेदार संस्कारक्षम बालवाङ्मय व नियतकालिकेही आहेत. इंग्रजी-हिंदी साहित्यबरोबरच कानडी, बंगाली, गुजराथी अशा इतरही अनेक भाषांतील प्रचंड ग्रंथसंग्रह ग्रंथालयात वाचकांसाठी उपलब्ध आहे. याशिवाय कॉम्प्युटर टेक्नॉलॉजीवरील हजारो पुस्तकांचाही अभ्यासक लाभ घेऊ शकतात. ग्रंथालयात सर्वांसाठी प्रशस्त आसन व्यवस्था आहे. ग्रंथालयाने ऑडिओ कॅसेट लायब्ररी नुकतीच सुरू केली आहे.

अभ्यासकांनी ग्रंथालयास आवर्जून भेट द्यावी असे ग्रंथपालांनी आवाहन केले आहे. प.पू.श्री.मामासाहेब देशपांडे ग्रंथालय व सार्वजनिक वाचनालय,'अन्नपूर्णा', श्रीसंत मामासाहेब देशपांडे पथ, माउली मंदिराशेजारी,आनंदनगर, हिंगणे खुर्द, पुणे ४११ ०५१.

*** बालकुमार साहित्य पुरस्कारासाठी पुस्तके पाठवा**

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलन संस्थेतर्फे प्रतिवर्षी बालवाङमयातील कथा, कादंबरी, कविता, चरित्र, विज्ञान, नाटक, एकांकिका, छंद, प्रथम प्रकाशन, अनुवाद, ललित, सजावट, उत्कृष्ट प्रकाशक इ. साठी वीस पुरस्कार देण्यात येतात. इच्छुक स्पर्धकांनी सन २००३ मध्ये प्रकाशित पुस्तकांच्या प्रत्येकी २ प्रती पाठवाव्या. संपर्क - दत्ता श्री. टोळ, कार्यकारी विश्वस्त, स्वरांजली, साहित्य परिषदेसमोर, पुणे - ३० (फोन : २४३३६०६५) मुदत - दि. ३० ऑगस्ट २००४

*** 'मानवी जीवनातील वेदना जीएंच्या लेखणीतून उमटल्या'**

जी. ए. कुलकर्णी हे गंभीर स्वरूपाचे सामर्थ्यवान साहित्यिक होते. त्यांच्या लेखणीतून मानवी जीवनातले दुःख, वेदनांचा सूर उमटत असे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांनी केले.

जी. ए. कुलकर्णी यांच्या स्मृतिदिनानिमित्त जी.ए. स्मृतिमंच आणि कस्तुरीगंध परिवार, नाशिक यांच्यातर्फे त्यांच्या साहित्यावर आधारित परिसंवाद आयोजित करण्यात आला होता.

श्री. मिरासदार म्हणाले, ''जीए हे मुळातच सामर्थ्यवान लेखक होते. त्यांच्या लेखनाची जातच वेगळी होती. त्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्वच वेगळे होते. मानवी जीवनातील दुःख हे अनेक रूपे घेऊन आपल्या समोर येत असते. त्याचे दर्शन जीएंच्या लेखनातून आपल्याला पाहायला मिळते. त्यांच्या लेखनाचा सूर हा मानवी जीवनातील दुःख, वेदना प्रभावीपणे दाखवणारा असतो. त्यांच्या लेखनाचा स्थायी भाव गंभीर लेखक असाच होता. ते स्वतः रसिक होते. त्यांचे विनोदी लिखाणही विलक्षण होते.''

श्री. शाम भुर्के म्हणाले, ''जी. ए. यांनी केलेले आदिमतेचे चित्रण त्यांच्या कथांतून प्रभावीपणे दिसते. सामान्यातले असामान्यत्व प्रकट करणाऱ्या संघर्षातील नायक जी. ए. कुलकर्णी यांनी खुलविला. मानवाच्या निर्णयस्वातंत्र्याचा, आत्मस्वातंत्र्याचा उद्‌घोष त्यांनी आपल्या लिखाणातून केला.'' ❐



# या सुखांनो

सुरेश वसंत नाईक

## सुखनिर्मिती करणाऱ्या आचारविचारांची उपयुक्त प्रणाली

माजी न्यायमूर्ती सुरेश वसंत नाईक यांनी 'कृषिवल'मध्ये लिहिलेल्या चाळीस लेखांचा संग्रह 'या सुखांनो' या नावाने पुस्तकरूपात प्रसिद्ध झाला आहे. ''वडिलांनी मुलांना कायम सुखी करण्यासाठी जो वारसा द्यावयाचा तो संपत्तीचा किंवा धनाचा नव्हे, तर मुलाला कायम सुखी करणाऱ्या विचारांचा.'' ही त्यांची भावना. तैतरीय उपनिषदात वरुण ऋषींनी आपला मुलगा भृगू याला 'मननात् जायते इति मंत्रः' असे जीवनविषयक अनुभूतीतून आणि चिंतनातून स्फुरलेले जीवनरहस्य प्रकट करणारे मंत्र देऊन, त्या मंत्रांद्वारे कायम सुखाचा वारसा प्रदान केला; त्याच भावनेने न्या. नाईक यांनी आपल्या प्रदीर्घ जीवनाच्या वाटचालीतून जमवलेले संचित या लेखांच्या रूपात वाचकवृंदापुढे ठेवण्याचा घाट घातलेला आहे.

या लेखांमध्ये न्या. नाईक यांनी स्वतःचे वाचन, स्वतःचे छंद, परदेश प्रवास निसर्ग विषयक प्रेम वगैरे वैयक्तिक संदर्भ प्रसंगोपात्त दिलेले आहेत; परंतु शक्यतो त्यांचा कल स्वप्रतिमा या लेखांतून फारशी डोकावू नये असाच दिसतो. जीवनाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी ही जीवनाचा आस्वाद घेण्याची, आहे त्यात सुख मानण्याची, जे काही लाभले आहे त्याबद्दल कृतज्ञता बाळगण्याची आणि मन-वृत्ती प्रसन्न ठेवून अवघ्या आयुष्याला आनंद यात्रा मानून जगण्याची आहे.

या त्यांच्या दृष्टीमुळे 'सुखांनो या' असे ते मुक्त कंठाने आवाहन करतात आणि या जगात प्रत्येकाला सुखी होण्याचा हक्क व संधी आहे; मात्र त्यासाठी योग्य ती पथ्ये पाळायला हवीत असे ते आवर्जून सांगतात. योग्य ते समर्पक दृष्टान्त देऊन ते आपली भूमिका स्पष्ट करतात. विपुल वाचन आणि बहुश्रुतता यामुळे त्यांच्या विवेचनात विविध स्तरावरचे संदर्भ येतात; त्या संदर्भांमुळेही त्यांच्या जीवनदृष्टीची व्यापक बैठक लक्षात येते.

या लेखांमध्ये न्या. नाईक यांनी हाताळलेले विषय नेहमीचेच आहेत. संस्कार, श्रद्धा, क्रोध, ताण-तणाव, भय, चिंता, द्वेषमत्सर, नैराश्य, विचारांचे प्रदूषण, अहंकार, आळस, निंदानालस्ती व निंदक, आयुष्यातील अपघात व अरिष्टे, इंद्रियांचे चोचले, महत्त्वाकांक्षा, मुखवटे वगैरे.



सुखाची अभिलाषा प्रत्येक माणसाला असते. सुखाचा माणसाला कंटाळा येत नाही; कुंतीप्रमाणे आमच्यावर नेहमी संकटे येऊ दे असे कोणी सहसा म्हणत नाही. आपण सुखाने जागावे हीच प्रेरणा प्रत्येकाला कार्यरत ठेवत असते. पण हे सुख नेमके कशात आहे हे माणसाच्या लक्षात येत नाही. पैसा, घरदार, मानमरातब, कीर्ती यात सुख आहे असे वाटते. पण सुख हे हुलकावणी देत राहते. ते मृगजळासारखे फसवे ठरते. सुखासाठी म्हणून केलेली प्रत्येक गोष्ट दुःखदायक ठरते.

न्या. नाईक हे सर्व सांगून 'सुख हे वस्तूत नसते, ते मानण्यावर असते' हे आपल्या आजीचे पालुपद सांगून 'सुख हे मनात असते; ती मनाची एक अवस्था असते', 'मनुष्य स्वतःला जेवढा सुखी समजत असतो तेवढाच तो सुखी असतो' हे अधोरेखित करतात. सुखाचे प्रेयस व श्रेयस असे प्रकार असतात. फक्त शरीरालाच सुख देणारे ते प्रेयस; पण कायम टिकणारे, हितकारक व मनाला आनंद देणारे ते श्रेयस. आपणाला सुख देणारी गोष्ट कोणती हे ठरवणारी बुद्धी म्हणजे विवेक. न्या. नाईक यांचे प्रतिपादन असे की देवाने या जगात माणसाने सुखी राहावे म्हणून असंख्य सुखे निर्माण केली आहेत. पण माणूस त्याकडे बघतच नाही. निसर्गातील नानाविध पशुपक्षी, फुले, रंग, हिमाच्छादित शिखरे, समुद्रावरच्या लाटा, शंख शिंपले... मनाचे शीड उभारले तर सुखेच सुखे दिसतील. आपल्या प्राचीन ऋषीमुनींनी हेच तर उपनिषदांत सांगितले आहे. (पृष्ठ ५)

> **सुखाचे प्रेयस व श्रेयस असे प्रकार असतात. फक्त शरीरालाच सुख देणारे ते प्रेयस; पण कायम टिकणारे, हितकारक व मनाला आनंद देणारे ते श्रेयस.**

''या जगात कितीतरी प्रकारची सुखे आहेत. त्यांचा मनसोक्त आस्वाद घेऊन जीवन कृतार्थ करणे हाच परमार्थ आहे. या सुखांकडे पाठ फिरवून करंटेपणाने जगणे हा कृतघ्नपणा आहे. जगात सुंदर कर्णमधुर नाद आहेत, सूर आहेत. त्याने नादब्रह्माची निर्मिती होते. अनेक नयनरम्य रंग आहेत. फुलपाखराच्या पंखापासून ते आकाशापर्यंत ही रंगांची नेत्रदीपक उधळण डोळ्यांना सुखावण्यासाठी केली आहे. सुंदर सुवासाची फुले आणि नानाविध सुगंधी वस्तूंची निर्मिती केली आहे ती सुखासाठीच! पदार्थांना अनेकविध चवी देऊन केवढे रुचिवैचित्र्य निर्माण केले आहे. नुसत्या जिभेने या साऱ्या आनंदाचा आस्वाद घेता येतो. अनेकविध स्पर्श. त्यांचे वर्णन करता करता कवी थकले आहेत. या साऱ्या सुखांचा जरुर आस्वाद घ्यावा. पंचेंद्रियांनी मन प्रसन्न व्हावे. पंचेंद्रियांमुळे हा सर्व आनंद घेता येतो, म्हणून ती पंचेंद्रिये देणाऱ्याचे आभार मानावे. आभाराचा नुसता विचार मनात आल्याबरोबर हा सारा आनंद शतपटीने वाढल्याचा अनुभव येतो.''(पृष्ठ ४७). 'कृतज्ञ मी, कृतार्थ मी' या भावनेचा असा आविष्कार क्षणोक्षणी आपल्या जीवनात व्हावा अशी अपेक्षा न्या. नाईक हे प्रकट करतात.

या सुखाच्या आणि आनंदाच्या अनुभूतीच्या आड येणारे काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, चिंता, अहंकार, ताणतणाव, इंद्रियांचे वळण व्यसने व सवयी..... त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची गरज असते. काही प्रमाणात या सर्व गोष्टींची गरजही असते, पण त्यांचा अतिरेक झाला की सर्व काही बिघडते. वेगवेगळी उदाहरणे देऊन, या लेखांमधून हे स्पष्ट करण्यात आले आहे.

विवेचनाच्या ओघात अनेक अर्थपूर्ण वचनेही येऊन जातात.

* चिंतामुक्त जीवन जगण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे देव मानणे. (४१)

* बीजगणितातील कठिण गणिते आपण 'क्ष' मानून सोडवतो. 'क्ष' ला तशी किंमत नसते; पण त्याच्या मदतीशिवाय कोडे सुटत नाही. जीवनातल्या अवघड समस्या सोडवण्यासाठी क्ष किंवा देव मानला तर जीवनाच्या सर्व समस्या चिंतेशिवाय आनंदाने सुटतील.

**समाजाला आपली खूप जरूर आहे. तेव्हा समाजाने आपल्याकडे येण्यापेक्षा आपणच समाजाकडे जाण्याची प्रवृत्ती ठेवली तर कितीतरी दुःखी लोकांचे अश्रू पुसता येतील.**

* कृतज्ञता हा अहंकार धुऊन काढणारा व मन स्वच्छ करणारा साबण आहे. (४५)

* निंदा करण्याच पाप करणाऱ्याला आणखी एक पाप करावे लागते. ते म्हणजे ढोंगीपणाचे किंवा खोटे बोलण्याचे. (६७)

* आत्मनिंदा हा रोज स्वत: घेतलेला विषाचा डोस आहे. त्याने आयुष्याचा हळूहळू नाशच होत असतो.(६८)

* शिष्टाचार हे कपड्यासारखे केवळ बाहेरच दिखावटी करणारे असू नयेत, ते फुलाच्या कळीसारखे आतून उमलून आलेले असावेत. (८०).

* ज्या घरात आईवडिलांच्या भांडणामुळे ताणतणाव निर्माण होत असतात अशा घरातील मुलांच्या दात आणि दाढा यांच्यात पोकळी निर्माण होते असे संशोधनाद्वारे लक्षात आले आहे. (८८)

* योग्य विचार अमलात आणणे किंवा बुद्धीला जे पटले आहे ते व तसे वागून वळवून घेणे म्हणजे संस्कार. (१०१).

* संशयी माणसाला कधीच विवेकी वागता येत नाही. (१११)

* धाकाने विकास होतो. भीतीने विनाश होतो. (११८)

* समाजाला आपली खूप जरूर आहे. तेव्हा समाजाने आपल्याकडे येण्यापेक्षा आपणच समाजाकडे जाण्याची प्रवृत्ती ठेवली तर कितीतरी दु:खी लोकांचे अश्रू पुसता येतील. (१३१)

* परमार्थ किंवा अध्यात्म हा विषय चर्चेचा नव्हे तर अनुभवाचा आहे. (१३९)

* अध्यात्मशास्त्राचे प्रयोजन 'मी'ची खरीखुरी ओळख माणसाला करून देणे होय. (१४८)



* विवेकाचे पर्यवसान विवेकात करणे हे प्रगतीचे लक्षण आहे. (१५१)

* भावनेच्या जागी बुद्धी किंवा तर्क वापरला तर दु:ख निर्माण होते. (१५१)

* ज्याला विवेकी व्हायचेच नाही तो माथेफिरू, धर्मांध, अतिरेकी असतो; ज्याला विवेक करताच येत नाही तो मूर्ख असतो. जो विवेक काय आहे हे माहीत असूनही तसे वागू शकत नाही तो गुलाम होय. - विल्यम डुकमांड (१५४)

* असूयेच्या बाबतीत लहान व्यक्ती किंवा मोठी व्यक्ती असा फरक नसतो. (१६२)

* मत्सर हा सूक्ष्मदर्शक भिंगाप्रमाणे असतो. तो लोकांचे दुर्गुण मोठे करून दाखवतो. (१६४)

* माणसाच्या विकासासाठी मत्सर / द्वेष ह्याचा वापर केल्यास विकास चटकन होतो; याला विरोधविकासवाद म्हणतात.(१६५)

* मत्सराला दुसऱ्याचा पराजय करण्यातच हेतुपूर्तता वाटते. स्वान्तसुखाय असे त्यात काही नसते. (१६५)

**या जगाचे वैशिष्ट्य असे आहे की येथे आपल्याला आपल्या कर्तृत्वाने आनंद मिळवता येतो आणि अनेक अंगांनी तो उपभोगता येतो.**

* स्वर्गात अप्सरा, अमृत असेल पण ग्रंथ नसतील; म्हणून मला स्वर्गसुखही नको वाटते. (१८२)

* कठोर परिश्रम करणारा माणूसच चारित्र्यसंपन्न असू शकतो. (२०८)

* निसर्ग व कला यांचे सौदर्य त्यांच्या शिस्तीत आहे. (२१५).

* शिस्त हे जीवनाचे सौंदर्य आहे. (२१५)


* सुखसाधनांची वाढ म्हणजे सुख नव्हे. (२३०)

* या जगाचे वैशिष्ट्य असे आहे की येथे आपल्याला आपल्या कर्तृत्वाने आनंद मिळवता येतो आणि अनेक अंगांनी तो उपभोगता येतो. (२३७)

* जीवनाची तटस्थवृत्ती विसर्जनाशिवाय येत नाही. (२४३)

वाचकांना विविध विषयांच्या संदर्भातील व्यावहारिक सूत्रांची जाणीव करून देणारे हे लेख समर्पक दृष्टान्तांनी आणि बोधपर कथांनी वाचनीय झाले आहेत. जीवनाचे मर्म उलगडून दाखवणारे, मनोवृत्तींचे उन्नयन करणारे हे सर्व चिंतन चिरंतन मानवी मूल्यांकडे पुन:पुन्हा लक्ष वेधतात. नीतिमूल्ये, आचारसूत्रे ही तशी कायमच मार्गदर्शक असतात. षड्रिपू काबूत ठेवणे, दया-क्षमा-करुणा-सद्भाव आचरणात उतरवणे, सकारात्मक दृष्टिकोनातून आयुष्यातील निर्णय घेणे, या गोष्टी सर्व काळी सर्वजणांना उपयुक्तच ठरतात. सुखांची आकांक्षा धरणाऱ्यांनी त्यांचा यथाशक्ती पाठपुरावा करावा हा संदेशच पुन्हा नव्याने देणारे हे न्या. नाईक यांचे लेखन आहे.

**पृष्ठे : २५२ ● किंमत : १७० रु. ● सभासदांना : १३५ रु. ● पोस्टेज : २० रु.**




# द ब्लाइंड ॲसासिन

मार्गरेट ॲटवूड
अनु : चारुता नानिवडेकर

**"ग्रॅंड स्टोरीटेलिंग ऑन ए ग्रॅंड स्केल... शीअर्ली एन्जॉयबेल"**

कादंबरी या वाङ्मयप्रकाराला देण्यात येणाऱ्या राष्ट्रकुल देशात सर्वश्रेष्ठ गणल्या जाणाऱ्या बुकर पुरस्काराने सन्मानित दि ब्लाइंड असॅसिन - अंध मारेकरी - या मार्गरेट ॲटवुड लिखित पुस्तकाचा मराठीमधूनही आस्वाद घेण्याची संधी मेहता पब्लिशिंग हाऊसने चोखंदळ रसिकांना उपलब्ध करून दिली आहे.

मार्गरेट ही कॅनडाची रहिवाशी असून तिच्या दि एडिबल वुमन (१८६९) या पहिल्याच कादंबरीने एक स्त्रीवादी लेखिका म्हणून तिला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवून दिली. त्यावेळी तिचे वय अवघे तीस वर्षांचे होते. त्याआधी तिची कवितांची दोन पुस्तके निघाली होती. आणि कॅनडाचा गव्हर्नर जनरल पुरस्कारही तिला लाभलेला होता. सरफेसिंग (१९७२), लेडी ओरॅकल (१९७६), लाइफ बीफोर मॅन (१९७९), दि हॅंडमेड्स् टेल (१९८५) कॅट्स आय (१९८८), दि रबर ब्राइड (१९९३), ॲलिआस ग्रेस (१९९६) या तिच्या कादंबऱ्यांमधून साठोत्तरीच्या काळातील स्त्रीची मानसिकता आणि दैहिकता यावर आधारित विषय तिने हाताळले; ते विषय पुढे स्त्री मुक्ती चळवळीने लोकांपर्यंत पोचवले. तरीही स्वत:ला स्त्रीमुक्तिवादी असे मार्गरेट मानत नसे; आणि तसे कोणी म्हटले तर ती आक्षेप घेत असे. समीक्षात्मक लेखनही तिने बरेच केले. असून दि सर्कल गेम (१९६६) , पॉवर पॉलिटिक्स (१९७१), यू आर हॅपी (१९७४), सरव्हायवल : ए थेमॅटिक गाइड टू कॅनेडियन लिटरेचर (१९९५), स्ट्रेंज थींग्ज (१९९५) या पुस्तकांचा समावेश तिच्या समीक्षात्मक लेखनात होतो.

'दि ब्लाइंड असॅसिन' ही कादंबरी बटनांचा कारखाना चालवणाऱ्या ग्रिफन कुटुंबाची १९१६ ते १९९८ पर्यंतच्या काळातील वाटचाल आणि वाताहत दाखवते. दुसऱ्या महायुद्धाच्या आधीची काही वर्षे म्हणजे १९३३ पासूनचे १९४८ या पंधरा वर्षांच्या काळातील तपशील मुख्य कथाभागाशी निगडित आहेत. आयरिस आणि लॉरा चेस या दोन बहिणींच्या जीवनातील घटनांवर त्यात भर आहे.





निवेदनाचे तीन स्तर या कादंबरीत वापरले आहेत. एक स्तर : वृत्तपत्रात वेळोवेळी ग्रिफिन घराण्याविषयी आलेल्या छोटेखानी बातम्या : कार पुलावरून कोसळून झालेला लॉरा चेसचा मृत्यू (२६ मे १९४५), लॉरा चेसची भाची एमी ग्रिफन हिचा जिन्यातून पडून मान मोडून झालेला मृत्यू (२५ ऑगस्ट १९७५), विनिफ्रेड ग्रिफन वय ९२ हिचा प्रदीर्घ आजाराने मृत्यू (१९ फेब्रुवारी १९९८), लॉरा चेस स्मृति पुरस्काराची योजना (मे १९९८), मंदीच्या तडाख्यात सापडलेल्या लोकांना चेस इंडस्ट्रीतर्फे करण्यात आलेली मदत (१६ मार्च १९३३), टोरंटो येथील रॉयल क्लासिक निटवेअरचे अध्यक्ष रिचर्ड ग्रिफन यांच्या साम्यवादावर टीका करणाऱ्या भाषणाचा वृत्तान्त (५ डिसेंबर १९३४), चेस कारखान्यातील टाळेबंदी व संप, कारखान्याला आग (१९ डिसेंबर १९३४), आयरिस चेस आणि रिचर्ड ग्रिफन यांचा वाङ्निश्चय (मे १९३५), शाळकरी मुलगी लॉरा चेस हरवल्याची व सुरक्षित असल्याची बातमी (ऑगस्ट १९३८) विनिफ्रेड ग्रिफन यांनी आयोजित केलेली कॉस्च्युम पार्टी (फेब्रुवारी १९३६) क्वीन मेरी या आलिशान जहाजाचे श्रीमंती वैभव (जुलै १९३६), स्पेनमधील साम्यवादी कारवायांवर ग्रिफन-चेस कन्सॉलिडेटेशनचे मालक रिचर्ड ग्रिफन यांचा जोरदार हल्ला (सप्टेंबर १९३६), ब्रिटनचे पंतप्रधान चेंबरलेन यांचे म्युनिच ठरावाबद्दल रिचर्ड ग्रिफन यांनी केलेले अभिनंदन (ऑक्टोबर १९३८), ओटावा येथील शाही दांपत्याच्या मेजवानीला रिचर्ड ग्रिफन यांची उपस्थिती (जून १९३९), आयरिस चेस ग्रिफन (वय ८३) यांचे पोर्ट टिकॉनडे रोगा येथील निवासस्थानी निधन (२९ मे १९९९) या बातम्यांवरून ग्रिफन-चेस या कुटुंबातील व्यावसायिक आणि व्यक्तिगत घटनांची कल्पना येते.

निवेदनाचा दुसरा स्तर हा लॉरा चेस हिने लिहिलेल्या कहाणीतून उलगडत जातो. ही कहाणी लॉराच्या अपघाती मृत्यूनंतर प्रसिद्ध होते; आणि एक अंध मारेकऱ्याच्या तसेच त्याच्या मुक्या प्रेयसीच्या हातून एका शहराच्या होणाऱ्या विनाशाची भविष्यकालीन कथा सांगते. अतिशय दूरवरच्या अवकाशात दुसऱ्या मितीमधे असलेला झायक्रॉन ग्रह - त्याच्या दक्षिणेला वाळवंट, पूर्वेला खोल दऱ्या, उत्तरेला जांभळ्या रंगाचा समुद्र, पश्चिमेला पर्वताच्या रांगा,. संध्याकाळी तिथल्या फुटक्या थडग्यांतून मृत स्त्रिया उठतात आणि तिथे फिरत राहतात. प्राचीन प्रगत संस्कृतीच्या खुणा तेथे दिसतात; पण सध्या ओसाड. फक्त पाच

**अतिशय दूरवरच्या अवकाशात दुसऱ्या मितीमधे असलेला झायक्रॉन ग्रह - त्याच्या दक्षिणेला वाळवंट, पूर्वेला खोल दऱ्या, उत्तरेला जांभळ्या रंगाचा समुद्र, पश्चिमेला पर्वताच्या रांगा,. संध्याकाळी तिथल्या फुटक्या थडग्यांतून मृत स्त्रिया उठतात**

भटक्या टोळ्यांचे वास्तव्य. मध्यावर एक दगडाची टेकडी. तिच्या खाली एका राजाचे थडगे. त्यांच्याबरोबरच गाडले गेलेले संपूर्ण शहर. आणि सगळे प्रजाजन... त्या शहरात भयंकर पापकर्मे झाल्याने देवाने त्या शहराचा विध्वंस केला अशी तेथील टोळ्यांची भावना. त्यांच्या रक्ताने पापांची झालेली शुद्धी...

त्यानंतरच्या हजारो वर्षात या ग्रहावरच्या लोकांची खूप प्रगती झाली. आठ हजार वर्षांपूर्वी ते पृथ्वीवर आले. त्यांनी इथे वसाहती केल्या. झायक्रॉनचे सात समुद्र, पाच चंद्र आणि तीन सूर्य... सेकील नॉर्न (नशिबाचा मोती) हे त्यांचे शहर जगात सर्वात सुंदर. तेथील उच्चवर्णीयांना स्निलफर्ड म्हणत. तंत्रज्ञानात प्रगत. ऐषारामी. सुंदर कपडे. इनिरॉड या गुलामांकडून ते सगळी कामे करून घेत. गालिचे विणणारी मुले आंधळी होत; त्यांची वेश्यागृहात रवानगी होई. ही मुलं कुलपं तोडून वेश्यागृहातून पलायन करीत. गळे चिरण्याचा व्यवसाय करीत. भाडोत्री मारेकरी म्हणून त्यांना मागणी असे. अंधत्वामुळे त्यांचे कान तीक्ष्ण असत. आवाज न करता ते हालचाली करीत. गळ्याजवळून पाकोळी जावी इतक्या अलगदपणे ते माणसाची मान चिरत. तेथील लोक सूर्यदेवाला दरवर्षी बालकांचा बळी देत; आणि चंद्राला नऊ कुमारिकांचा बळी देत. बळी देण्यासाठी काही श्रीमंत माणसे मुलींना चक्क दत्तक घेत. त्यांना देवीच्या मंदिरात ठेवून पालनपोषणासाठी पैसे देत. तेथे त्यांची उत्तम देखभाल होई. नृत्यगायनात त्या प्रवीण होत. पुढे त्यांना बळी दिले जाई. त्यांच्या कौमार्याचा भंग होऊ नये म्हणून त्यांना बंदोबस्तात ठेवत. बळी जाताना या मुली खूप ओरडत. म्हणून बळी देण्याआधी दोन महिने त्यांच्या जिभा कापण्याची प्रथा रूढ. नंतर त्यांची मिरवणूक निघे....

**ही कादंबरी रिचर्ड ग्रिफनच्या मेहुणीने लिहिलेली; त्यामुळे तिच्याकडे लोकांचे लक्ष जाते. तिच्या मृत्यूबद्दलच्या चर्चेला पुन्हा चालना मिळते. तिने आत्महत्या केली की तिला ढकलून देऊन ठार मारण्यात आले?**

- विज्ञानकथेच्या किंवा अद्‌भुत कथेच्या ढंगातली ही कादंबरी लॉरा चेसच्या मृत्यूनंतर बारा वर्षांनी हाती लागते; आणि आयरिस ग्रिफन ती प्रसिद्ध करते. एकमेकांवर प्रेम असणाऱ्या नायक-नायिकांच्या बोलण्यातून ही कहाणी पुढे जात राहते. पण ती कहाणी सलग सांगितलेली नाही. आरंभी पृष्ठ ४ ते २७ वर ती येते; पुढे अधून मधून. (पृष्ठ ७४-७६, १७९-१८१, २९३-२९४, ३६८-६९, ३७१-७२) या हस्तलिखिताचे प्रकाशन करताना मलपृष्ठावर चरित्रात्मक नोंद येते.

*''वयाची पंचविशी गाठण्याच्या आतच लॉरा चेस ह्यांनी अंध मारेकरी ही कादंबरी लिहिली. तीच त्यांची पहिली व अखेरची कादंबरी. १९४५ मध्ये दुःखद अपघातात त्यांचे निधन झाले. या तरुण व प्रतिभावान लेखिकेचे हे विस्मयचकित करणारे पहिलेच पुस्तक वाचकांच्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे.''*

ही कादंबरी रिचर्ड ग्रिफनच्या मेहुणीने लिहिलेली; त्यामुळे तिच्याकडे लोकांचे लक्ष जाते. तिच्या मृत्यूबद्दलच्या चर्चेला पुन्हा चालना मिळते. तिने आत्महत्या केली की तिला ढकलून देऊन मारण्यात आले?



हे पुस्तक बाजारात चर्चाविषय झाल्यावर रिचर्ड ग्रिफन राजकारण संन्यासाची घोषणा करतो. त्याची नेतेपदाची संधी कायमची हुकते. तो आयरिसला - आपल्या पत्नीला म्हणतो, '' पुस्तक... तू माझा घात केलास. ते प्रसिद्ध करायला तू किती पैसे दिलेस? लॉरा असलं काही घाणेरडं लिहिलं यावर माझा विश्वास बसत नाही.''

पत्नी आयरिस त्याला म्हणते, ''तुला विश्वास ठेवायला नको वाटतंय. कारण तू तिच्यापायी वेडा झाला होतास. तिच्याशी तू प्रेमाचे किळसवाणे खेळ खेळत होतास, त्यावेळी ती दुसऱ्या कुणावर प्रेम करीत होती; त्याची शय्यासोबत करीत होती हे तुला सहन होत नव्हतं. तिचं त्याच्यावर प्रेम होतं. तुझ्यावर नाही. निदान पुस्तकात तरी असं दिसतंय.... तिला तुझा तिरस्कार वाटत असणार. आणि का वाटणार नाही? तू तिच्यावर बलात्कार करायला निघाला होतास-''

रिचर्डचा मानसिक तोल या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर ढळतो. त्याची बहीण विनिफ्रेड ही आयरिसला त्याबद्दल दोष देते व म्हणते, ''तू त्याला राजकारणातून उठवलंस. त्याच्या लॉराबद्दलच्या स्मृतींचा विध्वंस केलास. त्याचं तिच्यावर खूप प्रेम होतं. ती गेली तेव्हा त्याला फार धक्का बसला.''

**तिचं त्याच्यावर प्रेम होतं. तुझ्यावर नाही. निदान पुस्तकात तरी असं दिसतंय.... तिला तुझा तिरस्कार वाटत असणार. आणि का वाटणार नाही? तू तिच्यावर बलात्कार करायला निघाला होतास-''**

याचा सूड उगवण्यासाठी आयरिसपासून तिच्या मुलीला म्हणजे एमीला विनिफ्रेड दूर करते; आणि तिच्याशी उघडउघड संघर्षाचा पवित्रा घेते. विनिफ्रेड तिला कुमाता, बदफैली, दारुडी म्हणते. आयरिस ही स्वैराचाराचा मार्ग स्वीकारून अनेक पुरुषांना जवळ करते. (दुसऱ्या शरीराचा दिलासा ही माझी गरज होती... परके पुरुष मला बरे वाटायचे.)

या कादंबरीतील निवेदनाचा तिसरा स्तर हा आयरिसच्या निवेदनाचा आहे. त्यानेच कादंबरीचा बहुतांश भाग व्यापला आहे. १९१६ साली झालेला जन्म, आर्थिक मंदीचा काळ, कामगारांचा संप, नवरा रिचर्ड याच्या बटनाच्या कारखान्याची युद्ध काळात झालेली आर्थिक प्रगती, भावंडांची वाताहत, आयरिसच्या रिचर्डचे मेहुणीवर, बहिणीवर - लॉरावर - जडलेले प्रेम; लॉराने एका सामान्य तरुणाशी लग्न करून केलेला संसार, त्यात तिची झालेली घुसमट, तिचा अपघाती मृत्यू, चेस व ग्रिफन व्यवसायाचे एकत्रीकरण, आयरिस आणि रिचर्ड यांच्यातील ताणतणाव - वगैरे कौटुंबिक हकिकत आयरिस सांगते.

कादंबरीची सुरुवात होते ती लॉराची कार पुलावरून खाली कोसळल्याने झालेल्या तिच्या मृत्यूने. कारचे टायर ट्रॅमच्या रुळात फसले असतील किंवा कारचे ब्रेक बिघडले असतील असा अंदाज पोलिस व्यक्त करतात. कोर्टही लॉराचा मृत्यू अपघाती असल्याचा निर्णय देते.

... आयरिसच्या या मुख्य निवेदनातून ग्रिफन आणि चेंस कुटुंबाच्या अर्धशतकाच्या

इतिहासावर प्रकाश पडतो.

कादंबरीच्या या त्रिस्तरीय निवेदनामुळे आणि कालक्रम मागे पुढे करण्याच्या रचना तंत्रामुळे वाचक गोंधळात पडण्याची शक्यता आहेच; परंतु वाचकाला थोडेफार श्रम पडावेत अशीच मार्गरेट ॲटवूडची इच्छा आहे. त्यामुळे तशीच लेखनशैली तिने वापरली आहे. ''तुम्हाला खरं काय ते जाणून घ्यायचं आहे, होय ना? दोन आणि दोन चार अशा सरळपणाने मी सगळं सांगावं असं तुम्हाला वाटतं आहे. पण असं सडेतोड लिहिणं म्हणजे सत्य असंच काही नाही. दोन आणि दोन म्हणजे खिडकीबाहेरून येणारा आवाज असू शकतो. दोन आणि दोन मिळून वारं सुद्धा होऊ शकतं...''(२९०). असा तिचा दृष्टिकोन आहे.

''काळाचा चोळामोळा करीत त्याला उडवून लावत क्षणाक्षणाचं आयुष्य जगत असतो आपण. आपली धावती कार आपणच असतो. माणसं, वस्तू, त्यांना मागे टाकून आपण मोकळे होऊ असं वाटतं तेव्हा. पण त्यांची सवय तेव्हा आपल्याला माहीतच नसते. ... ते नेहमी परत येतात. स्वप्नात काळ गोठलेला असतो. आपण पूर्वी जिथे असतो ना तिथून सुटका होत नाही.'' हे अनुभवाच्या स्वरूपाबद्दलचे लेखिकेचे भान.

> **पुस्तकाचं म्हणाल तर लॉराने त्यातलं एक अक्षरही लिहिलं नाही. ते मीच लिहिलं... जे जे आठवत होतं त्याचबरोबर जे मला वाटायचं ते मी लिहायचे... प्रसिद्धीची मला आवड नव्हती. किंवा ती सावधगिरीही असेल.**

आयरिसचे एकूण जीवन हे गुंतागुंतीचे होत जाते; आणि कादंबरीच्या शेवटी शेवटी त्याची काहीशी संगती वाचकाला लागू शकते. ''पुस्तकाचं म्हणाल तर लॉराने त्यातलं एक अक्षरही लिहिलं नाही. ते मीच लिहिलं... जे जे आठवत होतं त्याचबरोबर जे मला वाटायचं ते मी लिहायचे... प्रसिद्धीची मला आवड नव्हती. किंवा ती सावधगिरीही असेल. पण तसा विचार केला तर ही न्यायबुद्धी होती. कारण लॉराने एकही अक्षर लिहिलं नाही असंही म्हणता येणार नाही... लॉरा माझी मदतनीस होती. माझा डावा हात होती. आम्ही दोघींनीही हे पुस्तक मिळून लिहिलं. म्हणूनच एकजण नेहमी गैरहजर... लॉराच्या आयुष्याची - किंवा माझ्या आयुष्याची - ही कथा लिहायला घेतली तेव्हा मी हे का लिहिते आहे याची मला कल्पना नव्हती... पण आता मात्र ते स्पष्ट झालंय. हे सारं तुझ्यासाठी लिहित होते... लॉराचं स्मारक करायचं होते. त्यातून ती सुरुवात झाली...'' असे आयरिस शेवटी शेवटी स्पष्ट करते. (३६७)

२९ मे १९९९ रोजीच्या वृत्तपत्रात आयरिस चेस ग्रिफन हिचे वयाच्या ८३ व्या वर्षी बागेत बसलेल्या अवस्थेत निधन झाले अशी बातमी येते. आयुष्यात काही दुर्दैवी घटना घडतात; त्यामुळे आयुष्याला विचित्र वळण लाभते. त्याचे सामाजिक स्थान, त्याचे लैंगिक जीवन बदलत जाते. त्याबद्दल ती व्यक्ती कितपत जबाबदार असते? असा नैतिक प्रश्न ही कादंबरी विचारते. मार्गरेट ॲटवूड अत्यंत हळुवारपणे हा प्रश्न हाताळते.

....ह्या कादंबरीत सूचित केलेले नैतिक सामाजिक प्रश्न आणि त्यांचे व्यापक संदर्भ



उलगडण्यासाठी तिचे वाचन एकदा, दोनदा, अनेकदा करावेसे वाटेल. करावे लागेल. आपली हत्या करणारे मारेकरी आंधळे असतात. आंधळ्या शक्ती आपल्याला नेस्तनाबूत करीत असतात.

नव्या सहस्रकातील पहिली श्रेष्ठ कादंबरी असा या कादंबरीचा गौरव न्यूज डे ने केला.

''ॲबसॉर्बिंग, एक्सपर्टला रेन्डर्ड... व्हर्च्युओसिक स्टोरीटेलिंग इज ऑप डिस्प्ले'' असे न्यूयॉर्क टाइम्सने मत दिले.

''ग्रँड स्टोरीटेलिंग ऑन ए ग्रँड स्केल... शीअर्ली एन्जॉयबेल'' अशी वॉशिंग्टन पोस्ट बुक वर्ल्डने या कादंबरीची भलावण केली.

झपाटून टाकणारी सामर्थ्यशाली कादंबरी... झगमगती भाषाशैली मनस्वी व्यक्तिरेखा आणि त्यांच्या अंतरंगात डोकावणारी सूक्ष्म अंतर्दृष्टी... ॲटवुडची नवी कादंबरी इतकी आत्मनिर्भर, झकपक आणि परिणतप्रज्ञ आहे की ती समकालीनांना लीलया झाकोळून टाकते असे दि ॲटलान्टा जर्नल कॉंस्टिट्युशनने म्हटले.

**टी बुक क्लब १२ मधील तीसरे पुस्तक.**
टी क्लबच्या सभासदांना निम्म्या किंमतीत

**पृष्ठे : ३७६ ● किंमत : २५० रु. ● सभासदांना : २०० रु. ● पोस्टेज : २०रु.**

## मला आलेले अतींद्रिय अनुभव

## दिवाळी अंक वाचकांसाठी लेख स्पर्धा..

आपल्या नेहमीच्या जीवनात असे काही अनुभव येतात की आपल्या बुद्धीच्या वा तर्कशक्तीच्या मर्यादेत त्यांची संगती लावता येत नाही. भावी संकटाची पूर्व सूचना मिळणे, दुर्धरव्याधी अचानक दूर होणे, अपघातानंतर व अनपेक्षित मदत मिळणे, अरिष्ट टळणे, यांचे अनुभव अनेकांना आलेले दिसतात. योगसाधना, प्राणायाम याद्वारेही काही सिद्धी कोणाला प्राप्त झालेल्या असतात. कुंडलिनी जागृती, मृत्यूनंतरचे अस्तित्व वगैरेचाही अनुभव कोणाला आलेला असतो. संतमहात्म्यांच्या सहवासात वा स्पर्शानेही अशा काही गोष्टींची प्रचीती येते. काही विशिष्ट स्थळी आपल्याला काही वेगळे जाणवले असेल.

आपल्याला असे काही अनुभव आलेले असतील तर त्याबद्दलची सविस्तर माहिती आम्हाला कळवा. **शब्दमर्यादा - १००० शब्द. मुदत - ३० ऑगस्ट २००४.**

**सर्वोत्कृष्ट ठरणारे पहिले पाच लेख दिवाळी अंकात प्रसिद्ध करण्यात येतील; आणि त्यांना प्रत्येकी २०० रुपये पुरस्कार देण्यात येईल.**

**आमचा पत्ता - संपादक, मेहता मराठी ग्रंथ जगत,१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे - ४११ ०३०.**




# उत्सव

सुप्रिया वकील

## आटोपशीर भावविश्वाचा सुहृद सुखद रूपविलास

उत्सव हा सुप्रिया वकील यांचा दुसरा कवितासंग्रह.

काळजाला भिडणारे मोरपंखी क्षण, निसटत्या जाणिवांना लाभणारे शब्दरूप हे त्यांच्या कवितेचे आशयद्रव्य. त्यामुळे आपली कविता म्हणजे आपले प्रतिबिंब असे त्यांना वाटते.

ही कविता त्यांना 'सगळं शांत झाल्यावर, रात्री हळूच हलवून जागं करते, त्यांच्या कानाशी कुजबुजते, हसते, रुसते, खुणावते, कोऱ्या कागदावर स्वच्छंद पसरत राहते, आपल्या रंगात भिजवून चिंब करते; आणि पापण्या मिटू लागल्यावर ओंजळभर चांदण्या बाहेर ठेवून निघून जाते.

प्रतिभेची अशी लडिवाळ माया लाभलेल्या या कवयित्रीला ओंजळभर चांदण्या हाती आल्याचा प्रत्यय यावा यात काहीच नवल नाही. नित्य नजरेत भरणारी, अक्षय आनंद देणारी आणि चित्तवृत्तींना फुलवणारी निसर्गाची नवलाई म्हणजे त्यांना सृष्टिदेवीचा अखंड चाललेला उत्सव वाटतो. धरतीचं लेणं ठरणारा पाऊस आणि त्यानं निर्माण केलेली कंच हिरवाई हा आनंदाचा उत्सवच होय, तो आयुष्याचे अवघे क्षण रंगीबेरंगी करतो आणि जीवनसंगीताचे मुग्धमधुर स्वर आसमंतात उधळत राहतो - या भावनेने ही कवयित्री निसर्गाशी आपले मैत्र अनुभवते; आणि तोच मैत्रभाव आपल्या कवितेतून रसिकांपर्यंत पोचवू पाहते.

### निसर्ग

निसर्गाची अनेक रूपे कवयित्रीला भावतात आणि त्यांची तरल भावचित्रे ती रेखाटत राहते. या निसर्गाशी मैत्र जुळलेले असल्याने भेटीगाठींचे, सहवासाचे स्मरणही होत राहणे स्वाभाविक असते. त्यामुळेच संध्याकाळी नारिंगी लाटांवर सूर्य विसावत असताना, अंधाराच्या कुशीत क्षितिज विरघळून जात असताना, काळोखात लुकलुकणारे बोटींवरचे दिवे बघताना, कवयित्रीच्या तनामनातही वारं सळसळतं राहतं, कारण ''तुझ्या हातांच्या उबदार शिंपल्यात माझे हात मिटून घेतलेस तेव्हा माझ्या मनात रेशमी लाटा उलगडत राहिल्या आणि माझा पडाव पाण्यावर निर्धास्त डोलत राहिला.'' असा तिचा अनुभव आहे.



श्रावणात पिवळ्या उन्हाला पावसाचा बहर येतो, आणि गवतात मोती घननीळ होऊन टपटप पानांतून थेंबथेंब गातात... झाडाखाली फिरणारा किरणांचा थवा मग लाजणाऱ्या वेलीला कळ्यांचा मोहर आणतो. (पिवळ्या उन्हाला)

बालकवींच्या औदुंबरची आठवण देणारा एक डोह या कवयित्रीलाही झपाटून टाकतो.

*संथ काळसर डोहावर हलके तरंग मोहरणारे*
*मध्यजलावर कमळ हसरे खुलता खुलता दर्वळणारे*
*काठचे दिवे सामावणारे झोकून देऊन विरघळणारे*
*उंच झुकले झाड*
*वाकून बघत -----.*
*लांबच लांब क्षितिज काळे चकवणारे*

या डोहातले काळसर तरंग, मध्यभागी दर्वळणारे कमळ, काठावरचे उंच झाड आणि लांबच लांब चकवणारे क्षितिज... एक क्षणचित्रच डोळ्यापुढे साकार होत जाते. एकेक तपशील भरत जाते. (डोह).

या निसर्गदृश्यात नदीही वाहताना दिसते. आपल्या ओंजळीत पाऊस घेऊन ती मायेने काठाला देते; तुझे माझे असा काही आपपरभाव न ठेवता आपलं सर्वस्व उधळत ती सागरात निरलसपणे विलीन होते. (नदी)

या निसर्गदृश्यात हिरव्या शेतातून जाणारी लाल काळी पायवाटही आपल्या अंगावर मोकळ्या मस्तीत फिरणाऱ्या गुरांची खुरं बिनकुरकुर झेलत राहते. कोणी पानतंबाखूची पिचकारी मारली तरी त्याची खंत न बाळगता ती पायवाट अवघ्या शेताला सामावून घेत क्षितिजापर्यंत जाते. (पायवाट)

**अवघड घाट**
**डोंगरवाट**
**ढगांची दाटी**
**वारा पाठी**
**पानं चिंब**
**मस्तीत दंग**
**न्हाऊन उभी**
**मळभ नभी**
**दगड हिरवे**
**वाट हरवे**

येथील तळ्यातली निळाई आकाशाशी नाते जुळवते. त्यात उठणारे तरंग मोठमोठे होतात तसेच एक संथ गतीची शांतीही त्याला देतात. त्यात झाडे वाकून आपली रूपे न्याहाळतात आणि पक्षी स्वच्छंद चोचीने तहान भागवतात. (तळ्यामध्ये)

लाल तांबडे फुलांचे गुच्छ हलवत, गुलमोहर केशरिया रंगाने बहरून केशराने जमिनीवर सडा घालतो आणि आरक्त होऊन त्या केशराईचे अवलोकन करीत राहतो (केशरिया)

फुलपाखरं आपला मखमलीपणा आणि रंगांचा ताजेपणा सांभाळत वेव्ह लेंग्थ जुळणाऱ्या फुलात आपल्या पाकळ्या मिसळून क्षणभर विसावतात, लयदार भिरभिरतात.(फुलपाखरू)

पंखावरचे डोळे वटारून उगीचच फडफडणारे एक मोठे फुलपाखरू पंख मिटून, त्रिकोणी होऊन लाडिकपणे फुरंगटत परागांच्या पायघड्या अंथरते. (फुलपाखरू - मोठं अन इवले.)

अवघड घाट, डोंगरवाट, ढगांची दाटी, पानं चिंब, मस्तीत दंग, न्हाऊन उभी अशी ओली वाट हे सुंदर शब्दचित्र आहे.

निसर्गाकडे आत्मीयतेने बघण्याची ही दृष्टी आणि नदी, तळी, डोह, गुलमोहर, पायवाट, फुलपाखरू यांच्या अंतरंगात शिरण्याची ओढ - यांनी या कवितेला एक स्वतंत्र मुद्रा लाभते.

**घर शहाणसुरतं**

एक स्त्री म्हणूनही स्वत:चे वेगळे संवेदनाशील व्यक्तिमत्त्व या कवितांमधून समोर येत राहते. घरावाचून मी नाही आणि माझ्यावाचून घर नाही; ही प्रचीती आलेली ही कवयित्री आपलं घर शहाणंसुरतं असावं यासाठी धडपडत राहते. या घरात कसली भयभीती नाही; हे असे घर आणि घरधनीण यांच्यातले सायुज्य या घराला एक अंगभूत शहाणपण, प्रगल्भपण देत असते, याचा अभिमान या कवितेतून सहजगत्या आविष्कृत होतो.

**व्यवहार येतो तेंव्हा**
**नातं कुठे उरतं?**
**खणखण पैशावरच**
**काय ते ठरतं**
**नैतिक देणं आणि**
**कुठले आलेत बंध**
**चमचम रुपाया**
**करतो डोळे बंद**

जीवन आणि निसर्ग यांचा जो अखंड उत्सव चाललेला आहे, त्याचाच घर हा एक विस्तारित घटक असतो. त्या घरातले 'कपडे'ही या मऊसूत सलगीचे भागीदार असतात. त्यापैकी एखादा कपडा अलवार, तर एखादा चांगल्यावाईटाचा साक्षीदार असतो. त्याच्याशी काही भवबंध निगडित असतात. कपडे विटले, फाटले तरी त्यांचे विशिष्ट संदर्भ हे पक्के असतात. यासारखी भावजाणीव ही खास 'स्त्री'च प्रकट करू जाणे! (कपडे) या गृहिणीच्या सफाईदार हातांनी जमीन चकचकीत सारवली जाते; चिर न चिर लिंपवली जाते, लयबद्ध रेषा एकमेकीत मिसळून सोपाभर पसरतात; (रेषा)

हे गृहिणीपण कधी कधी यंत्रवत चाकोरीत बंदिस्त होतं. सवयीनं रोजची कामं पार पडतात पण त्यात जीव नसतो. दैनंदिन कामातला हा निरसपणा प्रकट करण्यासाठी वापरलेल्या प्रतिमांची आवाहकताही लक्षणीय आहे.

'पेपरचा खाडा, वाण्याची यादी, दूध... अर्धा जास्त... कमी झालेली सोनेरी झिलई.' (सोनेरी पेन)

*'तिच्या अलिप्त केसांवर भुरभुरलेलं गिरणीतलं पीठ'*
*'तिच्या डोळ्यांत वाळून विझलेल्या कलिंगडाच्या बिया'*
*'लोंबते कान धरून होते काळसर पितळी फुलांना,'*
*'बोराएवढा खोलगट खड्डा तारून काळ्या मण्यांना'*
*'फणसाचे हात काकणांतच रुतून टोचणारे'*

अशा वेळी 'माणसाच्या धावण्याला कुठे काही अंत नाही, हव्यासाच्या पायी शांत कुठे चित्त नाही, रुक्ष मने कोरडी, कुठे कुठे ओल नाही, कुठे कुठे सुख नाही, सुख लाभले तरी ते सुख वाटत नाही' अशीही पोकळी जाणवू शकते (कुठे कुठे)



## शपथा, आणाभाका आणि पत्रे

परंतु ही अशी उपरतीची, आत्यंतिक हतबलतेची जाणीव होण्याची वेळ ही आयुष्याच्या मावळतीकडे झुकू लागण्याच्या वळणावर येते. त्याआधीच्या यौवनाच्या टप्प्यावरची आकर्षण केंद्रे भलतीच आवाहक असतात. तनामनात सळसळतं वारं भरून राहिलेलं असते. जोडीदाराच्या हातांच्या उबदार शिंपल्यातले आपले हात मनात रेशमी लाटांचे थैमान उठवत असतात.(एक संध्याकाळ), संकोच निवतो; शब्दाहून स्पर्शाच्या नवलाईची भाषा उमगत जाते. मनात कविता उमलत जाते (शब्दस्पर्श), त्याच्या आगमनाने आपल्यालाच आपला विसर पडतो.

तू आलास अन मीच हरवले
मीच माझी माझी नाही ना उरले.(तू आलास अन)

भेटीच्या बहाण्यांची मग वेगळीच कहाणी सुरू होते. आईस्क्रीममधली जेली, जिन्याखालची वेल, आवडती साडी, पिसाट वारा-पाऊस, ओलेते दिवस... मुकेमुके ओठ, पाणावलेल्या डोळ्यांच्या कडा... शपथा आणि आणाभाका.

... आणि मग माप लवंडून 'आपल्या' घरी आल्यावर या कहाणीत आणखी रंग भरले जातात. गर्द हिरवा चुडा, हातावरची मेंदी, नव्या साडीचा सळसळणारा पदर..

**तुझ्या माझ्या नव्हत्या**
**रेषाच मिळाल्या कधी**
**का नाही घेतलं**
**लक्षात मी आधी**

**तुझ्यामाझ्यातलं सारं**
**हवेत विरलं**
**वेडं मन मात्र**
**उगाच झुरलं**

कधीतरी अपरिहार्य असणारा विरह. दुरावा. स्वत:शीच बोलून बोलून थकल्यावर पत्र लिहिण्याचा घातलेला घाट- पहिल्या प्रिय या मायन्याच्या शब्दापाशीच अडखळणे, मनाच्या खोल गाभ्यातले जुळलेले दुवे शब्दांत पकडता न येणे, शब्द उचंबळून ओठाशीच अडणे... पेन कागदाशीच थबकणे हा पत्र लिहिण्याचा अनुभव. (प्रिय)

... पण तरीही पत्र लिहिले जातेच. आणि पत्राची वाटही बघितली जाते. अपेक्षित पत्राची वाट बघताना उशीर झाला तर काळजीची कसर मनाला कापत जाते. पत्र हाती आले की मनाची होणारी उलघाल. कागदी स्पर्शानंही वाटणारा दिलासा. जाणवणारी मनाची ओल.

... अशा या आटोपशीर भावविश्वाचा सुहृद सुखद रूपविलास कोलाजसारखा या कवितांमधून समोर साकार होत जातो.

ताजी तरतरीत प्रतिमासृष्टी आणि अलवार अर्थगर्भ शब्दकळा यामुळे या कविता संग्रहाचे 'पहिलेपण' सहज नजरेआड होते.

शेवटी हायकू आणि चारोळ्या धर्तीच्या रचनाही जोडल्या आहेत.

**पृष्ठे : ८४ ● किंमत : ५० रु. ● सभासदांना : ४० रु. ● पोस्टेज : २० रु.**




# सुजाण पालकत्व

मीना टाकळकर

## अभ्यासाबाबतच्या विविध समस्यांवर उपयुक्त उपाय

आपल्या मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा अशी प्रत्येक पालकाची इच्छा असते. त्यादृष्टीने त्यांचे प्रयत्नही कमीजास्त प्रमाणात चालू असतात. 'सुजाण पालकत्व' हा शब्द अशा जागरूक पालकांसाठी वापरण्यात येतो.

या सुजाण पालकत्वाचे अनेक पैलू संभवतात.

मुलांची स्वाभाविक प्रवृत्ती व आवड लक्षात घेऊन, त्यांचे संगोपन करणे, त्यांन शिक्षण व आरोग्य साधना यासाठी योग्य ती संधी देणे, त्यांच्यावर संस्कार करणे, त्यांचे मनोबल वाढवणे, त्यांच्या बौद्धिक व भावनात्मक गुणवत्तेला चालना देणे, त्यांच्या अंगच्या उपजत कलागुणांना वाव देणे इ.

शिक्षण हा घटक या दृष्टीने विशेष महत्त्वाचा ठरतो.

'सुजाण पालकत्व' या पुस्तकात विद्यार्थ्यांचा अभ्यास, गृहपाठ आणि उजळणी या विषयावर पालकांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. मुलांच्या अभ्यासाची जबाबदारी केवळ शाळा व शिक्षक यांच्यावरच असते असे नाही, गृहीत धरून या पुस्तकाचे लेखन केले गेले आहे. शाळा घरात पोहचली पाहिजे आणि घर शाळेमध्ये यायला हवे; शाळेमध्ये होणाऱ्या अभ्यासाला घरच्या संस्कारांची जोड मिळेल असे परस्पर पोषक, सुसंवादी वातावरण हवे. सध्याच्या अभ्यासात गृहपाठ, लेखनाचा सराव आणि परीक्षेचे तंत्र यांनाही महत्त्व असते. त्याबद्दलचे अनेक कानमंत्र देणारे सुजाण पालकत्व हे पुस्तक आहे.

शाळेतील अभ्यासक्रमाची एक चौकट ठरलेली असते. वर्षभरातील अभ्यासक्रमाचे व परीक्षांचे एक वेळापत्रक असते आणि पालक-शिक्षक-विद्यार्थी आणि शाळा यामध्ये सुसंवादाचे व परस्पर विश्वासाचे वातावरण श्रेयस्कर असते. मुलांनी आपल्या पालकांना, आपली शाळा, शिक्षक, वर्गातील मित्र, अभ्यास, आवडते विषय, अवघड जाणारे विषय वगैरे गोष्टींबद्दल वास्तव माहिती देण्याची सवय लावून घेतली पाहिजे. तसे करण्यात पालकांनी त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यासातील प्रगतीबरोबरच त्याच्या सामाजिक-भावनात्मक व्यक्तिमत्त्वाचेही विविध पैलू योग्य प्रकारे विकसित होऊ शकतील. खेळ, कला, चित्रपट, संपर्क माध्यमे, संवाद, छंद यांतही त्याला स्वारस्य हवे.

मुलांना वाचनाची आवड लावणे, रोजची वृत्तपत्रे बघण्याची सवय लावणे, शाळेच्या ग्रंथालयात बसून पुस्तके हाताळण्याची सवय लावणे, वेळेचे नियोजन करण्याची सवय लावणे, यादृष्टीनेही प्रयत्न करावे लागतील.

गृहपाठाच्या दृष्टीने काही प्राथमिक पथ्ये पाळणे क्रमप्राप्त असते.

* वहीच्या पानाच्या उजव्या बाजूला तारीख लिहिणे.
* वहीच्या पानाच्या डावीकडे गृहपाठ किंवा वर्गपाठ याची नोंद करणे.
* वहीच्या पानाच्या वरच्या बाजूला गृहपाठाचे शीर्षक लिहून त्याखाली रेघ मारणे.
* विषय कोणता ते स्पष्ट लिहिणे.
* एखादी कल्पना विशद करण्यासाठी चित्रे व आकृत्या यांची जोड देणे.

त्याचबरोबर अक्षर सुवाच्च आणि वळणदार असणे, खाडाखोड टाळणे, एकाग्रता, चुका समजून घेणे, वाचन करून टिपणे काढणे, यांचाही सराव करावा लागतो.

वर्गात घेतल्या जाणाऱ्या चाचणी परीक्षांचीही तयारी करण्याचे एक तंत्र असते. विषयानुसार अभ्यासाचे तंत्र बदलते. मांडणी बदलते. भाषा, गणित, विज्ञान, चित्रकला, परदेशी भाषा, आलेख,तक्ते,..वेगवेगळ्या गोष्टी आत्मसात कराव्या लागतात. स्मरणशक्ती आणि सराव यांचा योग्य तो मेळ घालावा लागतो.

पालकांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाला उद्युक्त करताना सकारात्मक भूमिका घ्यावी. काय करावे आणि काय करू नये याबद्दलही या पुस्तकात मार्गदर्शन करण्यात आले आहे. उदा. अभ्यास करताना मुलीच्या आजूबाजूला सारखे पहारेकऱ्यासारखे पालकांनी पाळतीवर राहून त्याला तणावाखाली ठेवू नये. उलट त्याला मोकळे वाटेल असे वागून, गरज लागली तर मदतीला मी तयार आहे ही भावना तुमच्या कृतीतून व्यक्त व्हावी. अभ्यासाला बसलेल्या मुलांना घरातील कामे सांगून त्यांची एकाग्रतेत खंड आणू नये.

**पालकांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाला उद्युक्त करताना सकारात्मक भूमिका घ्यावी. काय करावे आणि काय करू नये याबद्दलही या पुस्तकात मार्गदर्शन करण्यात आले आहे.**

परीक्षेच्या वेळी उत्तरे लिहिताना काय काळजी घ्यावी याबद्दलही एका स्वतंत्र प्रकरणाद्वारे युक्तीच्या चार गोष्टी सांगितल्या आहेत.

मुलांना प्रोत्साहन देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवणे, त्यासाठी योग्य प्रकारे कौतुक करणे हेही सुजाण पालकत्वाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. हे कौतुक कसे स्वीकारावे याचीही मुलांना कल्पना असायला हवी. कौतुकाबरोबर टीकाही अटळपणे होत असते. टीकेला कसे सामोरे जावे आणि आपल्या व्यक्तिमत्त्वात त्यानुसार कसेबदल घडवावे

याचेही काही आडाखे मुलांच्या मनावर बिंबवले जाणे गरजेचे असते.

कौतुक/टीका यांचा स्वीकार कसा करावा याबद्दल अनेक सूचना पुस्तकात देण्यात आल्या आहेत. त्यापैकी काही.

* कौतुक करणाऱ्याकडे दुर्लक्ष करू नका.
* कौतुक किंवा स्तुतीची अवहेलना करणे टाळा.
* कौतुकाची चेष्टा किंवा टिंगलटवाळी करू नका.
* कौतुक करणाऱ्याच्या हेतूबद्दल अनाठायी शंका घेऊ नका. त्याच्या बुद्धीबद्दल किंवा हुशारीबद्दल प्रश्न उपस्थित करू नका.
* कौतुक स्वीकारताना आपण गोंधळलोय असे दाखवू नका.
* 'काय, मी?' वगैरे अशा शब्दांत कौतुक स्वीकारण्याचे टाळू नका.
* 'छे, अशी कायचेष्टा करताय?' असे न म्हणता चेष्टेला सामोरे जा.
* प्रशंसेचा अभिमानाने,आत्मविश्वासाने स्वीकार करा.
* कौतुक करणाऱ्याचे आभार माना. त्या प्रशंसेचा अधिक आदर करणाऱ्या प्रतिक्रिया द्या.
* प्रशंसा करणाऱ्याच्या नजरेला नजर देऊन ती स्वीकारा.
* प्रतिक्रिया मोकळेपणाने व्यक्त करा.
* प्रशंसा करणाऱ्याचीही ती स्वीकारताना तारीफ करा.(उदा. तुमची निरीक्षण शक्ती सूक्ष्म आहे हे जाणवते.)
* . 'अहो, हे चुकून मिळाले' त्यात काही विशेष नाही असे म्हणणे टाळा. खोटा विजय दाखवू नका.

> **कौतुक करणाऱ्याकडे दुर्लक्ष करू नका. कौतुक किंवा स्तुतीची अवहेलना करणे टाळा. कौतुकाची चेष्टा किंवा टिंगलटवाळी करू नका. कौतुक करणाऱ्याच्या हेतूबद्दल अनाठायी शंका घेऊ नका. त्याच्या बुद्धीबद्दल किंवा हुशारीबद्दल प्रश्न उपस्थित करू नका.**

मुलांना त्यांच्या चुकाही सौम्यपणे दाखवून द्या. सारखी नावे ठेवून त्याला नामोहरम करू नका. त्याला आपल्या भावना स्पष्ट करण्यास प्रोत्साहन द्या. त्याला योग्य वेळी शाबासकी द्या. मदतीचा हात द्या. आपण नाकारले जातोय ही भावना यातना देणारी असते. तशी भावना त्याच्या मनात मूळ न धरावी यासाठी त्याला समजावून घ्या, त्याचा आत्मविश्वास वाढवा. त्याच्याशी प्रेमाने वागा. त्याला मनमोकळे करू द्या. त्याचे ऐकून घ्या.

शिक्षण-अभ्यास-परीक्षा ही एक शिस्तबद्ध चाकोरी असते. त्याबरोबर व्यक्तिमत्त्वाची जडणघडण सकारात्मक व सामाजिक दृष्ट्या प्रगल्भ व्हावी ह्याकडेही लक्ष देण्याची गरज असते. ती आयुष्यभराची गरज असते. पालकांनी पालक म्हणून आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी जागरूक राहून आपल्या पाल्याच्या भावी जीवनाचा भक्कम पाया घालायला हवा.

**पृष्ठे : ६८ ● किंमत : ६० रु. ● सभासदांना : ४५ रु. ● पोस्टेज : २० रु.**





# पुरस्कार

महाराष्ट्र शासनाचे सन २००२-२००३ चे उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचे पुरस्कार १ जुलै रोजी सांस्कृतिक कार्यमंत्री अशोक चव्हाण आणि राज्यमंत्री विमल मुंदडा यांनी पत्रकार परिषदेत घोषित केले. काव्य, नाटक, कथा, ललित गद्य, चरित्र, आत्मचरित्र, इतिहास, संशोधन, दलित साहित्य इत्यादी २५ प्रौढ वाङ्मय प्रकारांत; तसेच बालसाहित्याच्या ११ प्रकारांत एकूण ६१ लेखकांच्या साहित्यकृतींना पुरस्कार जाहीर झाले आहेत. पुरस्कारासाठी एकंदर ८९३ पुस्तके आली होती. त्यात ७५६ पुस्तके प्रौढ वाङ्मय आणि १३७ पुस्तके बालवाङ्मय प्रकारातील आहेत. पुरस्कार वितरण समारंभ लवकरच आयोजित करण्यात येईल.

पुरस्कारांचा तपशील पुढीलप्रमाणे : (पुरस्कार, साहित्यकृती आणि लेखकाचे नाव)

**विभाग : प्रौढ वाङ्मय (१० हजार रुपये प्रत्येकी)**

**काव्य** : कवी केशवसुत पुरस्कार - पाऊसपाणी, डॉ. विठ्ठल वाघ
बालकवी पुरस्कार - सातबारा, नारायण सुमंत.

**नाटक** : राम गणेश गडकरी पुरस्कार - द पिलर ऑफ सोशल डेमॉक्रसी, अरुण मिरजकर;
अण्णासाहेब किर्लोस्कर पुरस्कार- पारध, रामनाथ चव्हाण.

**कादंबरी** : हरी नारायण आपटे पुरस्कार - बारोमास, सदानंद देशमुख;
वि. स. खांडेकर पुरस्कार- गटुळं, रवींद्र बागडे.

**कथा** : दिवाकर कृष्ण पुरस्कार - जन्म, द. ता. भोसले;
पु. भा. भावे पुरस्कार - उगवती मने, आनंद यादव.

**ललित गद्य** : अनंत काणेकर पुरस्कार - कालांतरीच्या गोष्टी, चंद्रकुमार नलगे;
वि. द. घाटे पुरस्कार - मण्यांची माळ, सुनीती देशपांडे.

**चरित्र आणि आत्मचरित्र** : लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार - वास्तवाचे अश्रू, गजानन कांबळे;
न. चिं. केळकर पुरस्कार - महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण, विठ्ठलराव पाटील.

**समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र** : श्री. के. क्षीरसागर पुरस्कार - म. जोतिबा फुले : साहित्य आणि साहित्यमूल्ये, डॉ. श्रीराम गुंदेकर;
नरहर कुरुंदकर पुरस्कार - साहित्यातील विचारधारा, के. रं. शिरवाडकर.

**इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व समाजशास्त्र** : महात्मा जोतिराव फुले पुरस्कार - चवदार तळे : एक मुक्तचिंतन, डॉ. माधव पोतदार;
डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार - तंजावरचे मराठी राज्य आणि संस्कृती - विद्या गाडगीळ.

**तत्त्वज्ञान, मानसशास्त्र व शिक्षणशास्त्र** : कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार - अध्यापनाची प्रतिमाने, प्रा. अशोक पाटील;
यशवंतराव चव्हाण पुरस्कार - महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, अशोक चौसाळकर.

**भाषाशास्त्र व व्याकरण** : ना. गो. कालेलकर पुरस्कार - ग्रामीण बोलीचा शब्दकोश द. ता. भोसले,
दादोबा पांडुरंग पुरस्कार - मराठी भाषासौष्ठव, वसंत वैरागकर.

**भौतिकशास्त्र व तंत्रविज्ञान** : सी. डी. देशमुख पुरस्कार - वेधक खगोल विज्ञान, विवेक भालेराव;
डॉ. एन. आर. तावडे पुरस्कार - मोटारगाडीची देखभाल व दुरुस्ती, चंद्रकांत शास्त्री.

**एकांकिका** : मामा वरेरकर पुरस्कार - आता उजाडले, डॉ. साहेब खंदारे.

**विनोदी साहित्य** : श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुरस्कार व आचार्य अत्रे पुरस्कार - ऑडिट, वामन होवाळ.

**ललित विज्ञान** : र. धों. कर्वे पुरस्कार - ब्रेनवेव्हज्, माधुरी शानभाग.

**संकीर्ण** : भाई माधवराव बागल पुरस्कार - अंतर्यात्रा, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी,

**क्रीडाशास्त्र** : राजर्षी शाहू महाराज पुरस्कार - कुस्तीचा आखाडा, डॉ. भास्कर मरसाळे.

**अनुवादित** : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरस्कार - आपला थोर मध्यमवर्ग, विश्राम गुप्ते.

**संपादित** : डॉ. वि. भि. कोलते पुरस्कार - गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी - विलास खोले.

**आधारित** : संत गाडगे महाराज पुरस्कार - मायकेल गॉकेलिनचं ज्योतिषशास्त्रीय संशोधन - यशोदा भागवत.

**संशोधन** : ग. त्र्यं. माडखोलकर पुरस्कार - मूलपाठदीपिका श्रीज्ञानदेवी, रामदास डांगे.

**ललित आस्वादपर लेखन** : पु. ल. देशपांडे पुरस्कार - लोकराहटीच्या वाटे, डॉ. गंगाधर मोरजे.



**शेती व शेतीपूरक लेखन** : वसंतराव नाईक पुरस्कार - कृषिचिंतन, डॉ. सुधीर भोंगळे.

**दलित, पददलित साहित्य** : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार - माणूस नावाचं गाव, राजेंद्र सोनवणे.

**संगणक, इंटरनेट, पर्यावरण व संरक्षणशास्त्र** : रँग्लर परांजपे पुरस्कार - तापली वसुंधरा, गार्गी लागू.

**बृहन्महाराष्ट्र लेखन पुरस्कार** : विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार - चेहऱ्यामागचे चेहरे, महादेव मोरे.

**सयाजी महाराज गायकवाड पुरस्कार** : एक अस्वस्थ पर्व - गोविंद नाईक.

**प्रथम प्रकाशन उपविभाग (प्रत्येकी रु. ५ हजार)**

काव्य : बहिणाबाई चौधरी पुरस्कार - आणि तरीही मी, सौमित्र.

नाटक : लोटू पाटील पुरस्कार - काया परकाया, रंगनाथ तिवारी.

कादंबरी : अण्णाभाऊ साठे पुरस्कार - माझी काटेमुंढरीची शाळा, गो. ना. मुनघाटे.

कथा : ग. ल. ठोकळ पुरस्कार - मिरगीपेर, विजय जावळे.

ललित गद्य : ताराबाई शिंदे पुरस्कार - त्या आठवणींचा झोका, ना. धों. महानोर.

एकांकिका : दादासाहेब धनवटे पुरस्कार - चेहरे आठवणींचे आणि इतर एकांकिका, दिनकर बेडेकर.

अनुवादित : वा. रा. कांत पुरस्कार - पाच अंगणाचं घर, लीला बांदिवडेकर.

संपादित : रा. ना. चव्हाण पुरस्कार - समग्र लेखक बाबूराव बागूल, डॉ. कृष्णा किरवले.

समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र : कुसुमावती देशपांडे पुरस्कार - आस्वादनामा, मनोज तायडे.

**विशेष पुरस्कार विभाग (प्रत्येकी २ हजार रुपये )**

काव्य : इंदिरा संत पुरस्कार - रानच सारे पेटून उठले, बबन चहांदे.

नाटक : वि. वा. शिरवाडकर पुरस्कार - देहभान, अभिराम भडकमकर.

कादंबरी : उद्धव शेळके पुरस्कार - गराडा, डॉ. भीमराव वाघचौरे.

कथा : बी. रघुनाथ पुरस्कार - शांते तू जिंकलीस, नीलम माणगावे.

ललित गद्य : मधुकर केचे पुरस्कार - फुलचुखी , व. बा. बोधे.

एकांकिका : जयवंत दळवी पुरस्कार - दीपगृह आणि समुद्रपक्षी, वसुधा पाटील.

विनोदी साहित्य : दतू बांदेकर पुरस्कार - रेकॉर्ड ब्रेक - १२५, वि. आ. बुवा.

संकीर्ण : कृष्णराव भालेकर पुरस्कार - राजधानीतून, अशोक जैन.

ललित विज्ञान : संत तुकडोजी महाराज पुरस्कार - बहर, डॉ. श्री. श. क्षीरसागर.

चरित्र आणि आत्मचरित्र : धनंजय कीर पुरस्कार - तंट्या भिल्ल, बाबा भांड.

समीक्षा आणि सौंदर्यशास्त्र : वा. ल. कुलकर्णी पुरस्कार - तेंडुलकरांची नाट्यप्रतिभा, वसंत दावतर.

इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व समाजशास्त्र : क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार - जोतिराव फुले : सामाजिक तत्त्वज्ञान, डॉ. सरोज आगलावे.

तत्त्वज्ञान, मानसशास्त्र व शिक्षणशास्त्र : बॅ. नाथ पै पुरस्कार - मनाचिये गुंथी, डॉ. नंदकुमार मुलमुले.

भाषाशास्त्र व व्याकरण : ना. गो. नांदापुरकर पुरस्कार - मराठी व्याकरणाचा अभ्यास, डॉ. प्रकाश परब.

भौतिकशास्त्र व तंत्रविज्ञान : डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार - मानवगाथा : एक शोधनिबंध, गो. म. दळवी.

**बालवाङ्‌मय विभाग (पुरस्कार प्रत्येकी ५ हजार रु.)**

काव्य : भा. रा. तांबे पुरस्कार - पळसपापडी, डॉ. सुरेश सावंत;

वा. गो. मायदेव पुरस्कार - मौजच मौज, शंकर विटणकर.

नाटक : राम गणेश गडकरी पुरस्कार - उंटावरचे शहाणे, सूर्यकांत सराफ.

कादंबरी : गोपीनाथ तळवलकर पुरस्कार - बोलक्या हत्तीची करामत, चंद्रकांत महामिने.

छोट्या गोष्टी : साने गुरुजी पुरस्कार - मुलं ती फुलं, लीला शिंदे.

लोककथा : ना. धों. ताम्हनकर पुरस्कार - सुखाचा शोध, विठ्ठल हिलाल पाटील.

एकांकिका : वा. गो. आपटे पुरस्कार - खुल जा सिमसिम, विनिता पिंपळखरे.

चरित्रे : वि. कों. ओक पुरस्कार - कुसुमाग्रज : एक महामानव, प्रभा आपटे;

ग. ह. पाटील पुरस्कार - बाबा आमटे : लोकसेवामहर्षी - डॉ. भगवान कवठेकर.

ललित गद्य : रेव्हरंड ना. वा. टिळक पुरस्कार - आमची शाळा, राजीव तांबे.

सर्वसामान्य ज्ञान (छंद व शास्त्रे) : यदुनाथ थत्ते पुरस्कार - आपला आहार आपले औषध, आशा भांड;

राजा केळकर पुरस्कार - नोबेलनगरीतील नवलस्वप्ने, सुधीर थत्ते.

बालसाहित्य समीक्षा : दि. के. बेडेकर पुरस्कार - रा. वा. शेवडे गुरुजी : जीवन व साहित्य, शशिकांत महाडेश्वर.

## * डॉ. मोहन आगाशे यांना गटे पुरस्कार

जर्मनीतील ग्रिप्स थिएटरची भारतात रुजवातच नव्हे तर प्रसार करणारे आणि ग्रिप्स शैलीतील भारतीय बालनाट्यांचे प्रयोग यशस्वीपणे करणारे ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. मोहन आगाशे यांचा जर्मनीतील गटे इन्स्टिट्युटने २००४ सालचे 'गटे मेडल' देऊन गौरव केला. ६ जुलै रोजी रात्री रॉयल बॉम्बे याच जर्मन क्लबमध्ये जर्मन काऊन्सलेट आणि मॅक्स मुल्लर भवन यांनी आयोजित केलेल्या समारंभात ते त्यांना प्रदान करण्यात आले.

या समारंभाआधी एनसीपीएच्या एक्सपरिमेंटल थिएटरमध्ये पुण्याच्या महाराष्ट्र कल्चरल सेंटरने सादर केलेल्या 'आईपण! बाबापण!' या ग्रिप्स शैलीतील बालनाट्याचा प्रयोग जर्मन प्रजासत्ताकाच्या डेप्युटी काऊन्सल जनरल श्रीमती जेर्डा विंकलर आणि मॅक्स मुल्लर भवनचे संचालक डॉ. पीटर शबर्ट यांच्या उपस्थितीत झाला. दोघांनीही डॉ. मोहन आगाशे यांच्या कामाचा गौरवाने उल्लेख केला. जर्मनी आणि अन्य देशांतील सांस्कृतिक अभिवृद्धीसाठी असामान्य कामगिरी करणाऱ्या व्यक्तीस दरवर्षी हा सन्मान दिला जातो. डॉ. आगाशे यांनी १९८३ सालापासून भारतात ग्रिप्स थिएटर चळवळ रुजवण्यास सुरुवात केली. आज येथे मराठी, हिंदी, बंगाली, कन्नड आणि इंग्रजी आदी भाषांमधून ग्रिप्स नाटके सादर केली जातात. या प्रयोगांचा धावता आढावा घेणारी एक चित्रफीत यावेळी दाखवली गेली.

२० वर्षे 'घाशीराम कोतवाल' करून तोचतोचपणाचा कंटाळा आलेल्या आपल्या मनाला ग्रिप्स थिएटरच्या परिचयाने उभारी आली आणि इथे आपल्याला काहीतरी वेगळे करून दाखवता येण्याजोगे आहे असे वाटले, डॉ. मोहन आगाशे यांनी, असे सांगितले. ते म्हणाले, 'मी इथली अनेक बालनाट्यं पाहिली. त्यात मनोरंजन होतं पण ती पौष्टिक नव्हती. ग्रिप्स'ची बालनाट्यं पौष्टिक आहेत, त्यात मानसशास्त्रीय प्रथिनं भरपूर आहेत आणि त्यात शिक्षणाची शल्यचिकित्सा करण्याची राखून आहे. या नाटकांमध्ये मुलांसाठी भरपेट करमणूक आहे आणि प्रौढांनी शिकावेत असे धडे आहेत. हे मिनिंगफुल थिएटर आहे.' श्रीरंग गोडबोले, डॉ. रविंद्र आणि शुभांगी दामले, विभावरी देशपांडे यांच्या सक्रिय सहभागामुळे ग्रिप्स रंगभूमीची चळवळ आपण पुढे नेऊ शकलो, असे त्यांनी नमूद केले.

## * डॉ. गोवारीकर यांना 'आर्यभट्ट पुरस्कार'

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वसंतराव गोवारीकर यांना 'दि अॅस्ट्रोनॉमिकल सोसायटी ऑफ इंडिया' या मान्यवर संस्थेचा प्रतिष्ठेचा मानला जाणारा 'आर्यभट्ट पुरस्कार' राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या हस्ते २३ जुलैला बंगलोर येथे देण्यात आला. एक लाख रुपये आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

अग्निबाण प्रक्षेपण तंत्रज्ञान आणि अवकाश यंत्रणा व्यवस्थापनाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल डॉ. गोवारीकर यांना हा पुरस्कार बदला गेला.सध्या डॉ. गोवारीकर 'इस्रो'चे डिस्टिंग्विश्ड् प्रोफेसर' हे पद भूषवीत आहेत. पंतप्रधानांचे विज्ञान सल्लागार म्हणूनही त्यांनी काम केले आहे. 'दि अॅस्ट्रॉनॉमिकल सोसायटी ऑफ इंडिया'तर्फे दिला जाणारा 'आर्यभट्ट' हा सर्वांत मोठा आणि अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार आहे. स्वत: डॉ. कलाम तसेच ज्यांच्या नावाने डॉ. गोवारीकर सध्याचे पद सांभाळत आहेत ते प्रा. सतीश धवन हेही या पुरस्काराचे यापूर्वीचे मानकरी आहेत. ''या पुरस्कारासाठी माझी निवड केली याचा मला विलक्षण आनंद झाला. मी केलेल्या कार्याची दखल घेतली गेली, याचे समाधान आहे,'' अशी प्रतिक्रिया डॉ. गोवारीकर यांनी व्यक्त केली.

## * जयप्रकाश दगडे, यशवंत भंडारे यांना राज्याचा पत्रकारिता पुरस्कार

राज्य शासनातर्फे उत्कृष्ट पत्रकारिता आणि उत्कृष्ट लेखनासाठी दिल्या जाणाऱ्या वर्ष २००२ च्या पुरस्कारांची घोषणा मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी मंत्रालयात केली.

राज्यस्तरावरील मराठी पत्रकारितेसाठी दिला जाणारा बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार जयप्रकाश दगडे यांना तर शासकीय गटातील यशवंतराव चव्हाण पुरस्कार यशवंत भंडारे यांना जाहीर करण्यात आला आहे.

विभागीय पुरस्कारांमध्ये नाशिक विभागासाठी, महाराष्ट्र टाइम्सचे धुळ्याचे वार्ताहर संजय झेंडे यांना एकवीस हजार रुपयांचा दादासाहेब पोतनीस पुरस्कार जाहीर झाला आहे. पुणे विभागाचा नानासाहेब परूळेकर पुरस्कार राजेंद्र माने यांना तर औरंगाबाद विभागासाठी अनंत भालेराव पुरस्कार व्ही.एस.कुलकर्णी यांना घोषित करण्यात आला.

कोल्हापूर विभागासाठी ग. गो. जाधव पुरस्कार राजेंद्र जोशी यांना तर नागपूर विभागासाठीचा

ग. त्र्यं. माडखोलकर पुरस्कार रवींद्र जुनारकर यांना जाहीर झाला. चंद्रपूर-अमरावती विभागाच्या लोकनायक बापूजी अणे पुरस्कारासाठी निशिकांत राऊत यांची तर कोकण विभागाच्या शि.म.परांजपे पुरस्कारासाठी रघुनाथ विश्वनाथ उर्फ भाऊ सिनकर यांची निवड करण्यात आली.

राज्यस्तरीय आणि विभागीय अशा दोन्ही गटातील पुरस्कारांसाठी पत्रकारांची पाच वर्षातील कामगिरी, शासनाच्या विकास विषयक कामाच्या प्रसिद्धीसाठी केलेले प्रयत्न यांचा विचार करण्यात आला.

पुरस्कार निवडीसाठी अकरा सदस्यांची परीक्षण समिती नियुक्त करण्यात आली होती, त्यामध्ये सात अशासकीय आणि चार शासकीय सदस्य होते.

### * मृण्मयी पुरस्काराचे वितरण

विजया मेहता यांच्या हस्ते रोहिणीताईंच्या 'नृत्यभारती' संस्थेला मृण्मयी पुरस्कार प्रदान करण्यात आला त्या प्रसंगी बोलताना विजया मेहता यांनी 'गोनीदां'चे शब्दचित्र उभे केले. या कार्यक्रमात विजयाबाईंनी 'शितू' या ध्वनिफितीचे, तर दीर्घकथाकार भारत सासणे यांनी 'डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू गोनीदा डॉट कॉम' या वेबसाईटचे प्रकाशन केले.

'गोनीदां'चे हसणे, त्यांचे रडणे, त्यांचे नीटनेटके वागणे, पत्र लिहिण्याची तत्परता आणि कॅलिग्राफीसारखे अक्षर, गंभीर बोलायला लागले की फेऱ्या घालणे वगैरे विशेष त्यांनी नोंदविले. ''माझ्या आईशी भुताच्या गप्पा मारणारे आणि तिचे आंबट जेवट आवडीनं जेवणारे हेच अप्पा 'कुण्या एकाची भ्रमणगाथा' लिहितात, याचे नवल वाटायचे. पण परस्परविरोधाभास हाच त्यांच्या सर्जनशीलतेचा बिंदू होता, असे माझ्या लक्षात येते. ते सामाजिक गोष्टींत भाग घेत असत; पण त्याच वेळी त्यांतून लांब जाऊन एकाकी होत असत. यातून जी वस्तुनिष्ठता यायची त्यातून त्यांच्या साहित्यकृतींचे ब्रह्मांड तयार झाले.'' 'शितू' नाटकाबाबतच्या विविध आठवणीही त्यांनी सांगितल्या.

रोहिणी भाटे म्हणाल्या,''आमची 'नृत्यभारती' ही संस्था म्हणजे हा वर्ग होता. माझ्या ज्येष्ठ भगिनी वत्सला भाटे यांनी तिचे संस्थेत रूपांतर करण्याचा आग्रह धरला. छंद, वर्ग आणि व्यवसायापलीकडे नृत्य हेच श्वास आणि चिंतन झाले पाहिजे, असे तिने सांगितले. तसे केल्यावर ती स्वस्थ झाली आणि तिच्याऐवजी मला पुरस्कार घेऊ दिले.''

श्री. सासणे म्हणाले, ''गोनीदांनी त्यांच्या नंतरच्या दोन-तीन पिढ्यांवर प्रभाव टाकला. काहींनी त्यांच्या शैलीचे, तर काहींनी विचारांचे अनुकरण केले. अनेक साहित्यिकांबाबतची माहिती संकलित स्वरूपात नसते. या वेबसाईटच्या निमित्ताने ती उपलब्ध होते आहे, हे महत्त्वाचे आहे. त्यांच्या पत्रव्यवहाराचाही समावेश वेबसाईटमध्ये करावा.''

डॉ. विजय देव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. वीणा देव यांनी पुरस्काराबाबतची भूमिका सांगितली. मधुरा देव-डहाणूकर यांनी वेबसाईटबाबत माहिती सांगितली. मृणाल देव-कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

### * 'नाट्यलेखकांनी लोकरंगभूमीची संहिता निर्माण करावी'

''नाट्यलेखकांनी लोकरंगभूमीची संहिता निर्माण करण्याचा प्रयत्न लेखकांनी करावा,'' असे आवाहन डॉ. रामचंद्र देखणे यांनी केले.



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पिंपरी-चिंचवड शाखेने आयोजित केलेल्या पु. ल. देशपांडे राज्यस्तरीय नाट्यलेखन स्पर्धेचे पारितोषिक वितरण 'सकाळ'चे वृत्तसंपादक सुरेशचंद्र पाध्ये यांच्या हस्ते झाले.

डॉ. देखणे म्हणाले,''आजच्या नाटककारांना लोकरंगभूमीच्या सामर्थ्याचा विसर पडलेला दिसतो. जोपर्यंत मौखिक परंपरेतील नाट्यसंहिता लिहिली जात नाही, तोपर्यंत नाट्यलेखनाची संहिता पूर्णत्वास गेली, असे म्हणता येणार नाही. त्यामुळे मौखिक परंपरेला संहितेची जोड देण्याचा प्रयत्न करावा.''

नाट्यलेखन स्पर्धा दोन वर्षांऐवजी दर वर्षी व्हावी, अशी सूचना करून श्री. पाध्ये म्हणाले, ''मराठी रंगभूमी मराठी माणसाचा श्वास आहे का, याविषयी विचार करण्याची वेळ आली आहे; परंतु या श्वासाला साधनेची जोड मिळाल्यास त्यातील प्रगल्भता स्पष्ट होईल.''

स्पर्धेतील पारितोषिक विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे : एकांकिका विभाग, एकांकिकेचे नाव व कंसात लेखकाचे नाव:

प्रथम : शून्यागार (अरविंद कुलकर्णी, निगडी)

द्वितीय : वेलकम, द न्यू पाईड पायपर (प्रकाश जोशी, अकोला), पहाट (डॉ. मंदार जोगळेकर, चिंचवड)

तृतीय : मनोपंथन (डॉ. दिनेश रसाळ, सोलापूर),

उत्तेजनार्थ : आंदोलन (योगेश पंडित, नगर), अरे देवा, पैसा पैसा! (विजय पोळ, पुणे), सम्राज्ञी (लक्ष्मीकांत रांजणे, वाई), सज्जाद (नंदकुमार कान्हेरे, पुणे), सुशीलेचा देव, (य. ज. महाबळ, औरंगाबाद), संकट की सोय? (श्रीमती सुशीला मराठे, पुणे).

**दोन अंकी नाटक स्पर्धा :**

प्रथम : नीरक्षीर (विनायक गोगटे, पुणे)

द्वितीय : बायको माहेरी, प्रेमिका घरी (अरुण नाशिककर, नाशिक),

तृतीय : अवशेष (डॉ. सतीश साळुंके, चिंचवड), संगीत विरले सूर भैरवीचे (स्वाती ठकार, चिंचवड),

उत्तेजनार्थ : अंतरंग (नंदकुमार कान्हेरे, पुणे), राईच्या पर्वतावरून (पुरुषोत्तम धाक्रस, पुणे), अकल्पित (अमित पंडित, माटुंगा), आशा परत का गेली? (कमलिनी फडके), संगीत वियोगार्थ होते मीलन (मधुसूदन शहा, पुणे).

### * एकांकिका लेखन ही नाट्यलेखनापेक्षा कठीण गोष्ट!

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेशी संलग्न मराठी नाटककार संघाने आयोजित केलेली कै. वि. र. बाम एकांकिका लेखन स्पर्धा पार पडली. त्याचा पारितोषिक वितरण समारंभ आणि एकांकिका प्रकाशन सोहळा २४ जून रोजी सोशल सर्व्हिस लीग शाळेच्या सभागृहात नाटककार सुरेश खरे यांच्या हस्ते संपन्न झाला. गेली अनेक वर्षे नाटककार संघ ही स्पर्धा त्रिदल प्रकाशनाच्या सहकार्याने यशस्वीपणे आयोजित करत आहे. त्रिदल प्रकाशनची धुरा वाहणारे बापू टिळक यांनी या स्पर्धेस विशेष चालना दिली. बापूंच्या आकस्मिक निधनानंतर त्यांच्या पत्नी श्रीमती वंदना टिळक यांनी प्रकाशन व्यवसाय त्याच

शिस्तीत सुरू ठेवला. नाटककार संघाच्या वि. र. बाम एकांकिका लेखन स्पर्धेसही पाठबळ दिलं. या स्पर्धेतल्या प्रथम तीन क्रमांकाच्या एकांकिका त्रिदल प्रकाशनातर्फे प्रकाशित करण्यात येतात. यंदाही ती प्रथा पाळण्यात आली. प्रथम क्रमांक प्राप्त 'जिहाद' (ले.- मनीष अनसूरकर), द्वितीय क्रमांक विजेती 'काळोखगर्भ' (ले.- अरूण सावळेकर) आणि तृतीय विजेती 'कुणासाठी? कशासाठी?' (ले.-संजय गोविलकर) या एकांकिकांचं प्रकाशन 'त्रिदल'ने केलं.

समारंभाच्या प्रारंभी प्रकाश गावडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मराठमोळ्या गीतांचा नजराणा पेश केला. सुरेश खरे यांना वि. र. बाम आणि बापूसाहेब टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केल्यानंतर नाटककार संघाचे कार्यवाह के. राघवकुमार यांनी एकांकिका स्पर्धेचा उद्देश विषद केला. सुरेश खरे यांनी एकांकिका या नाट्यप्रकाराचं मर्म सांगितलं आणि 'एकांकिका लेखन ही नाट्यलेखनापेक्षाही कठीण गोष्ट आहे,' असं प्रतिपादन केलं. नाटककार संघाचे उपाध्यक्ष अशोक पाटोळे यांनी, लवकरच नाटककार संघातर्फे नाट्यलेखन कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा केली. ते म्हणाले, 'नाटककार संघाचे अध्यक्ष शशिकांत मोरे यांनी नाटककार संघामध्ये जोश आणि जोम निर्माण करण्याचं मोठं कार्य केलं आहे.'

नाटककार वसंत जाधव यांनी एकांकिकांना पुस्तकरूपाने प्रसिद्धी देणारे बामशेठ आणि बापू टिळक यांच्या कामगिरीचा गौरवाने उल्लेख केला. श्रीमती टिळक यांनी, नव्या एकांकिकाकारांनी नवे विचार घेऊन लेखन करावं, असा सल्ला दिला आणि नाटककार संघाला एकांकिका लेखन कार्यशाळा आयोजित करावी अशी सूचना केली.

*** विद्या व्यास पुरस्कार**

विद्या सहकारी बँकेतर्फे देण्यात येणारा 'ज्येष्ठ शिक्षक विद्या व्यास पुरस्कार' या वर्षी डॉ. ह. वि. सरदेसाई व डॉ. नरेंद्र कृ. करमरकर यांना जाहीर झाला. पन्नास हजार रुपये रोख, 'महर्षी व्यासमुनींचे' स्मृतिचिन्ह व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

जीवनाच्या विविध उत्तुंग कामगिरी बजावणाऱ्या दोन गुरुतुल्य शिक्षकांना दर वर्षी बँकेतर्फे हा पुरस्कार देण्यात येतो. यंदा पुरस्काराचे सातवे वर्ष आहे.

बँकेतर्फे 'ज्येष्ठ शिक्षक विद्या व्यास पुरस्कार', तसेच 'तरुण शिक्षक विद्या व्यास पुरस्कार' देण्यात येतात, या वर्षी मात्र खास बाब म्हणून दोन्ही सन्मानार्थींना 'ज्येष्ठ शिक्षक विद्या व्यास पुरस्कार' देण्यात आले.

जन्माला आलेले प्रत्येक मूल बुद्धिमानच असते, त्याच्या ठायी असणारी उपजत बुद्धिमत्ता कशी वाढवावी, याचे उत्तम मार्गदर्शन डॉ. सरदेसाई यांनी 'घरोघरी ज्ञानेश्वरी जन्मती' या पुस्तकातून केले आहे. या पुस्तकाच्या आजपर्यंत आठ आवृत्त्या निघाल्या आहेत.

डॉ. करमरकर पुण्यातील 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च'मधील 'कॉम्प्युटेशनल मॅथेमॅटिकल लॅबोरेटरी'चे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. 'लिनियर प्रोग्रॅमिंग अल्गॉरिदम्स अँड इटस् इम्प्लिमेंटेशन' या विषयावरील संशोधनाचे त्यांनी पेटंट मिळविलेले आहे. त्यांचे गणित विषयावरील छत्तीस संदर्भ ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. देश-विदेशांतील कित्येक शास्त्रज्ञांना संशोधन करीत असताना या संदर्भ ग्रंथांचा उपयोग होतो. ❐



# लोकप्रिय लेखकांच्या काही गाजलेल्या कथा




रणजित देसाई

| | |
|---|---|
| मधुमती | ८० |
| गंधाली | १०० |
| मोरपंखी सावल्या | ६० |
| कातळ | ९० |
| प्रपात | ९० |
| बाबुलमोरा | १२५ |
| मेख मोगरी | ६० |



वि. स. खांडेकर

| | |
|---|---|
| पाकळ्या | ७० |
| अबोली | ५० |
| विद्युत प्रकाश | २५ |
| दवबिंदू | ६० |
| सांजवात | ६० |
| स्वप्न आणि सत्य | ७० |
| विकसन | १०० |
| सरत्या सरी | ५० |
| भाऊबीज | १२० |
| आजची स्वप्ने | ९० |
| ढगाआडचे चांदणे | ६० |
| प्रीतीचा शोध | १५० |
| क्षितिजस्पर्श | ८० |
| सुवर्णकण (खलिल जिब्रान) (अनु.) | ८० |
| वेचलेली फुले (अनु.) | ५० |
| इंद्रधनुष्य | ५० |



आनंद यादव

| | |
|---|---|
| माळावरची मैना | ११० |
| घरजावई | १०० |
| शेवटची लढाई | ९० |
| आदिताल | ६० |
| उखडलेली झाडं | १५० |
| झाडवाटा | ९० |
| उगवती मने | १०० |



व. पु. काळे

| | |
|---|---|
| मोडेन पण वाकणार नाही | ८० |
| वलय | १०० |
| वपु ८५ | ६० |
| स्वर | १०० |
| संवादिनी | ७० |
| इन्टिमेट | १०० |
| बाई बायको कॅलेंडर | १०० |
| वपुर्वाई | १०० |
| ऐक सखे | १२० |
| घर हरवलेली माणसं | १४० |
| वन फॉर द रोड | १०० |
| रंग मनाचे | १८० |
| महोत्सव | १५० |
| काही खरं काही खोटं | १२० |
| कर्मचारी | ११० |
| तप्तपदी | १२० |
| सखी | १४० |
| भुलभुलैय्या | १४० |
| मी माणूस शोधतोय | १२० |



माधवी देसाई

| | |
|---|---|
| असं म्हणू नकोस | १२० |
| कथा सावलीची | ७० |
| सागर | ६० |
| किनारा | ९० |
| शुक्रचांदणी | १०० |

## लोकप्रिय ठरलेले काही कथासंग्रह

| | | |
|---|---|---|
| विटाळ | दया पवार | ७० |
| दलित कथा | संपा.गं. पानतावणे/चं. नलगे | ६० |
| मळणी | रा. रं. बोराडे | ८० |
| रिवणावायली मुंगी | राजन गवस | १३० |
| **(आनंदीबाई शिर्के म.सा.प. पुरस्कार)** | | |
| सावित्रीचा निर्णय | नागनाथ कोत्तापल्ले | १०० |
| ईगीन २००४ | महादेव मोरे | १५० |
| सातव्या मुलीची सातवी मुलगी | अशोक पाटोळे | १२० |
| झोका | अच्युत बर्वे | १०० |
| प्रवाह | पांडुरंग कुंभार | ८० |
| सांजवा | सुमेध वडावाला | ८० |
| उत्तरार्ध | विजया राजाध्यक्ष | १३० |
| निसटलेले | आशा बगे | १०० |
| ऋतूवेगळे | आशा बगे | ७० |
| आठवणीतला दिवस | द. ता. भोसले | १०० |
| मनस्विनी | द. ता. भोसले | १२० |
| खसखशीचा मळा | द. ता. भोसले | ७५ |
| मुळे आणि पाळे | वसंत नरहर फेणे | ८० |

### अनुवादित कथासंग्रह

| | | |
|---|---|---|
| गहाण पडलेली टेकडी : मारिया श्रेस २००३ (गुजराथी) | अनु. अजंनी नरवणे | १२० |
| मुंबई... मुंबई ! : **विक्रम चंद्र** | अनु. नारायण आवटी | १५० |
| द्वंद्व : **विजयदान देथा** (राजस्थानी कथा) (म.सा.प.- स.ह.मोडक अनुवाद पारितोषिक २००१) | अनु. वनिता सावंत | १५० |
| रावीपार : **गुलजार** | अनु. पाडळकर/वेल्हाळ | १५० |
| फुलांचे बोल : **आन्ना साक्से** (रशियन कथा) | अनु. सुनीती देशपांडे | १०० |
| कथांतर (रशियन कथा) | अनु. सुनीती देशपांडे | १२० |
| पूजाघर : **प्रतिभा राय** (उडिया कथा) | अनु. डॉ. वासुदेव/राधा जोगळेकर | ८० |
| टू कट् अ लाँग स्टोरी शॉर्ट : **जेफ्री आर्चर (ऊ)** | अनु. लीना सोहोनी | १८० |
| द स्ट्रीम विदिन (बंगाली कथा) | अनु. मीना वैशंपायन | १३० |
| इंटरप्रिटर ऑफ मॅलडीज् : **झुंपा लाहिरी** | अनु. भारती पांडे | १७० |



# बालनगरी



## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **अजयची हेरगिरी** | **४८** |
| **ओळखा पाहू** | **५२** |
| **स्पर्धा निकाल** | **५३** |
| **ऑलिंपिक :** | |
| **काही गमती जमती** | **५४** |

# अजयची हेरगिरी

शब्दांकन
शंकर सारडा



रात्रीच्या वेळी कोणाची तरी किंकाळी ऐकू आली.












त्या रात्री
उद्या सकाळी इन्स्पेक्टर रविकाकांनाच गाठू या,पण ही घुबडं आज इतकी का ओरडताहेत?
रविकाका हे पोलिस अधिकारी होते.
घुबडं? पण इथं घुबडं कुठून आली?
रात्रभर घुबडांचे ओरडणे चालू होते.
ही घुबडं दोन असावीत. दोन वेगवेगळे आवाज येता हेत.
दुसऱ्या दिवशी
रविकाकांना आपली शंका सांगायलाच हवी. काही गूढ असल्यास ते शोधून काढतील
फोनवर रविकाका
होय सर. मी त्यांचा तपास करतो. त्यातला एकजण जखमी झालाय. तो फार दूर गेला नसणार,
अजय थोडावेळ ते ऐकून घेतो.
रविकाका, तुमचे ते गुन्हेगार कुठे लपलेत ते मला ठाऊक आहे. आमच्या घराजवळच्या रिकाम्या गॅरेजवर संध्याकाळी या.
BAD 420


त्या रात्री
तर मग अजय, कुठं आहेत गुन्हेगार?
ऐका
हा तर घुबडांचा आवाज दिसतोय थांब कुणीतरी येतेय वाटतं?
ते दोघे लपून बसले.
आता
आणि
हात वर कर! तुम्हाला मी अटक करतोय.
हो!
का?
नंतर
अजय, तू खरंच मोठं काम केलंस. ते गुन्हेगार आहेत हे तू कसे ओळखलेस?
एका रात्री मी किंकाळी ऐकली. दुसऱ्या दिवशी सकाळी बंदुकीची गोळी आणि रक्ताचे डाग झाडाजवळ दिसले. नंतर घुबडांचे ओरडणे- मला आश्चर्य वाटले. इथे घुबडं तर नाहीत.
तुमचं बोलणं पोलिस चौकीत ऐकलं, तेव्हा उलगडा झाला. गुन्हेगाराला गोळी लागली असावी आणि ते गॅरेजमधे लपले असावे. घुबडाचा आवाज करून ते साथीदारांना इशारा देत असावेत.
अरे वा! तू तर वस्ताद हेरच निघालास!





# ओळखा पाहू

सोबत भारतातील विविध प्रान्ताच्या वेशभूषा केलेल्या स्त्री-पुरुषांची चित्रे दिलेली आहेत. कोणते चित्रं कोणत्या प्रान्तातील वेशभूषेचे आहे ते ओळखा व बक्षीस जिंका!






















**अचूक उत्तरे पाठवणाऱ्या पहिल्या ३ मुलांना छान छान चित्रांची आकर्षक २ पुस्तके बक्षीस! उत्तर पाठवताना आपले नाव, पत्ता व इयत्ता लिहायला विसरू नका.** **मुदत १० सप्टेंबर २००४पर्यंत!**

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथ जगत**, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवन समोर, पुणे ३०



# स्पर्धा निकाल


## जुलै २००४ अंकातील ठिपके जोडा व चित्रं रंगवा स्पर्धा

### यशस्वी स्पर्धक

**१) सायली डकरे,** निवडे (साळवण), ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर

**२) आदित्य जानोरकर,**(१ली) मु.साहीत, पो. राहीत, ता.बार्शीटाकळी,अकोला

**३)आदित्य दातार,**(२री)४४, अन्नपूर्णा, जयप्रकाशनगर,गोरेगाव(पू)मुंबई ६३



**यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन!**

**तुमचे बक्षीस लवकरच पाठवत आहोत!**





# ऑलिंपिक : काही गमती जमती

### ऑलिंपिक : इ. स. पूर्व ७७६ मध्ये आरंभ











ऑलिंपिक स्पर्धांचा प्रारंभ २८०० वर्षांपूर्वी म्हणजे इ.स. पूर्व ७७६ या वर्षी झाला. दर चार वर्षांनी ग्रीसमधल्या ऑलिंपिया टेकडीच्या परिसरात या स्पर्धा होत. त्यात महिलांना भाग घेण्यास मज्जाव होता. धावणे, उड्या मारणे, भाला फेक, वजन उचलणे, थाळीफेक, कुस्ती, रथांच्या शर्यती, मुष्टियुद्ध वगैरे क्रीडाप्रकारांचा त्यात समावेश असे. या स्पर्धा पाहण्यासाठी रोमचे सम्राट व इतर देशांचे नागरिक यांनाही आमंत्रण असे. इ. स. ३९३ पर्यंत म्हणजे एक हजारावर वर्षे या स्पर्धा चालल्या. रोमने ग्रीक साम्राज्य गिळंकृत केल्यावर या स्पर्धा थांबल्या. त्यानंतर १५०० वर्षांनी त्यांचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न सुरू झाला. १८९६ मध्ये अथेन्स येथे नव्याने ऑलिंपिक स्पर्धांचा आरंभ झाला. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी १९४० व १९४४ या वर्षी या स्पर्धा झाल्या नाहीत.

शंभर मीटर धावणे या शर्यतीत १८९६ च्या स्पर्धेत थॉमस बुर्की याने १२ सेकंदाचा विक्रम करून प्रथम क्रमांक मिळवला. इ. स. २००० च्या सिडनी ऑलिंपिकमध्ये हेच अंतर ९.८७ सेकंदात तोडून अमेरिकेच्याच मॉरिस ग्रीनने सुवर्णपदक पटकावले.

### ऑलिंपिक : माणसाचा वेग प्राण्यांपेक्षा कमीच!


ऑलिंपिकमध्ये मायकेल जॉन्सनचा धावण्याचा वेग ताशी ३६.५१ किलोमीटर तर कॉर्ल लुईसचा ताशी ४०.२७ किलोमीटर एवढा होता. बॉब हेजने टोकियो ऑलिंपिकमध्ये ताशी ४१.६६ किलोमीटरचा विक्रम नोंदवला.

प्राण्यांच्या तुलनेने माणूस हा धावण्यात मागेच आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| गोरिला | ताशी | ४८ | किलोमीटर धावतो. |
| कोल्हा | ताशी | ६४ | किलोमीटर धावतो. |
| कुत्रा | ताशी | ६७ | किलोमीटर धावतो. |
| घोडा | ताशी | ६९.६ | किलोमीटर धावतो. |
| हरीण | ताशी | ९७ | किलोमीटर धावते. |
| चित्ता | ताशी | ११५ | किलोमीटर धावतो. |

जेसी ओवेन्स या खेळाडून बर्लिन ऑलिंपिकमध्ये १९३६ साली धावण्यात अजिंक्यपद मिळवले. त्यानंतर उदरनिर्वाहासाठी त्याने काही प्राण्यांबरोबर पळण्याचे जाहीर प्रयोग केले. हॅवाना (क्युबा) येथे त्याने २१०.१७ मीटर्स धावण्याची घोड्याबरोबरची शर्यत १५ मीटर्सनी जिंकली. घोडा ताशी ५० ते ७७ किलोमीटर वेगाने धावतो हे लक्षात घेता आवेन्सच्या धावण्याचे कौतुक करायला हवे.













### सर्वोत्तम ॲथलेट

* हॉलंडची फेनी ब्लॅंकर्स कोएन हिने तिसाव्या वर्षी लंडन ऑलिंपिकमध्ये भाग घेऊन धावण्याच्या चार प्रकारात सुवर्णपदके पटकावली. त्यावेळी तिला दोन मुले होती. एकूण सहा जागतिक विक्रमांची नोंद तिच्या नावावर आहे. हा तिचा विक्रम अन्य कोणा महिला क्रीडापटूने ओलांडलेला नाही. त्यामुळे तिला आंतरराष्ट्रीय ॲथलॅटिक संघटनेने विसाव्या शतकातील सर्वोत्तम ॲथलेट म्हणून इ. स. २०००च्या ऑलिंपिकमध्ये गौरव केला.

* रशियाची क्रीडापटू लॉरेसा लॉटेनिना हिने १९५६ ते १९६४ या काळात ऑलिंपियॉडमध्ये भाग घेऊन ९ सुवर्णपदके व ९ इतर पदके जिंकली.

* **शाळकरी नादिया - दहापैकी दहागुण -** रुमानियाची शाळकरी मुलगी नादिया कोमानेसी हिने १९७६ च्या मॉंट्रियल ऑलिंपिकमध्ये आपल्या लवचिक शरीराने सर्वांना थक्क केले. जिमनॅस्टिक्सच्या अनेक प्रकारात पैकीच्या पैकी गुण तिने मिळवून नवा इतिहास घडवला.

* **बारा वर्षाची सोन्या हेनी - ३ सुवर्णपदेक -** बर्फावरील फिगर स्केटिंगमध्ये बारा वर्षाच्या सोन्या हेनी या नॉवेच्या मुलीने ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक मिळवले. १९२४ ते १९३६ पर्यंतच्या तीन ऑलिंपिकमध्ये तीन सुवर्णपदके तिने मिळवली फिगर स्केटिंगवर अधारित नृत्य कार्यक्रमासाठी तिने जगभर दौरे केले आणि जगातील सर्वात श्रीमंत क्रीडापटू म्हणून तिची ख्याती पसरली. आपल्या संपत्तीचा वापर करून नॉर्वेमध्ये तिने एक आवाढव्य क्रीडा संग्रहालय स्थापन केले.

* इ. स. २००० मध्ये सिडनी येथे झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेत १९९ देशातील एकूण ११ हजार स्पर्धक उतरले होते. त्यातील ४२५४ महिला होत्या. फक्त ९ देश असे होते की ज्यांनी महिला क्रीडापटूंना पाठवले नव्हते.

## मॅरेथॉनमध्ये सामील होणारी पहिली महिला



१८९६ मध्ये अथेन्सला ऑलिंपिक स्पर्धा नव्याने घेण्यास प्रारंभ झाला. त्यात महिलांना भाग घेण्यास परवानगी नव्हती. तरीही स्टॅमटा रेविथी या तीस वर्षे वयाच्या महिलेने मॅरेथॉन या ४२,१९५ मीटर्स अंतराच्या स्पर्धेत भाग घेण्याचा तिने निश्चय केला. अथेन्सला जाण्यासाठीही तिच्याजवळ पैसे नव्हते. तेव्हा ती आपल्या दीड वर्षाच्या मुलाला कडेवर घेऊत ती पायीच निघाली. वाटेत तिला काही लोकांनी आर्थिक मदत दिली. अथेन्सला पोचल्यावर तिने संयोजकांची भेट घेऊन मॅरेथॉन मध्ये भाग घेण्याची आपली इच्छा आहे असे सांगितले. महिलांना या स्पर्धात भाग घेण्यास परवानगी नाही असे त्यांनी सांगितले. ''तसे ऑलिंपिक जाहीरनाम्यात कुठे उल्लेख आहे?'' या तिच्या प्रश्नावर ते निरुत्तर झाले. पण महिलांना मज्जाव हा संकेत होताच.

शेवटी काय झाले?

मॅरेथॉन या खेड्यापासून अथेन्सपर्यंत रेविथी धावलीच. निघताना मॅरेथॉनच्या महापौराचे, न्यायाधीशाचे पत्र व त्यावर निघण्याच्या वेळेची नोंद करून घेतली.

साडेतीन तासात तिने हे अंतर तोडले. वाटेत थोडा वेळ थांबून न्याहरी केली. तेथील लोकांशी गप्पा गोष्टी केल्या. नाहीतर हे अंतर तीन तासातच तोडले गेले असते असे तिने सांगितले.

अथेन्सच्या स्टेडियमवर ती पोचली. पत्रकारांना व अधिकाऱ्यांना तिने आपले पत्र देऊन, त्यावरील वेळेच्या नोंदीची दखल घेण्यास सांगितले.

पत्रकारांनी तिच्या या विक्रमाच्या बातम्या छापल्या. त्यावर अग्रलेख लिहिले. मुख्य शर्यतीत तिला भाग घेण्यास मज्जाव केल्याबद्दल ऑलिंपिकच्या संयोजकांवर टीका केली.

रेविथीच्या पावलावर पाऊल ठेवून पुढे काही महिलांनी ऑलिंपिक स्पर्धात पुरुषवेषात घुसखोरी केली.

रोइंगची विजेची ऑलिकमिलिअट हिच्या प्रयत्नाने १९२१ साली पहिले महिला ऑलिंपियॉड मोनॅको येथे झाले. त्यात फ्रान्स, इंग्लंड, इटाली, नॉर्वे व स्वित्झर्लंड यांनी भाग घेतला. इतर सहा राष्ट्रांनी आपले प्रतिनिधी पाठवले १९२२ मध्ये पॅरिसला महिला अजिंक्यपद स्पर्धा झाली; आणि पुढे त्यांचेही नियमित आयोजन सुरू झाले. तेव्हा १९२८ साली ऑलिंपिक संघटनेने महिलांना ॲथलेटिक्समध्ये प्रवेश देण्याचे ठरवले. नंतर इतरही क्रीडाप्रकारात महिलांना प्रवेश खुला झाला. तेव्हा मिलिअटने आंतरराष्ट्रीय महिला क्रीडा संघटना ही आपली संस्था बंद केली.